वरील नमूद खर्च हा नगर परिषद मार्फत करण्यात येणा–या खर्चाच्या तुलनेने दुप्पट होत असून नगर परिषदेची आर्थिक परिस्थिती पाहता खर्च करणे शक्य नाही.सदरचा खर्च हा नगरपरिषद निधीमधून करावयाचा आहे.नगर परिषदेची वसूली व त्यातून करावयाचा दैनंदिन अत्यावश्यक खर्च यात तफावत असल्याने नगर परिषद निधीवर अधिकचा बोझ्र वाढून भविष्यात M/s BAC Infratech Pvt. Ltd and Vinci Global Pvt. Ltd (JV) यांचे नियमित देयके प्रदान करण्यास अडचण निर्माण होऊ शकते.

या सर्व बाबींचा विचार करून सभागृहात ठरविण्यात येते की, यवतमाळ नगर परिषद क्षेत्रातील विद्यमान एल.ई.डी पथदिवे देखभाल व दुरुस्ती तसेच नवीन एल.ई.डी लाईट्स आणि CCMS चा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरुस्ती साठी( १० वर्ष ) राज्य स्तरावर नेमलेल्या निविदा धारक M/s BAC Infratech Pvt. Ltd and Vinci Global Pvt. Ltd (JV) या संस्थे बरोबर करारनामा करणे बाबत सध्यस्थितीत स्थगिती देण्यात येत आहे. सदर विषया बाबत M/s BAC Infratech Pvt. Ltd and Vinci Global Pvt. Ltd (JV) यांचे दर अधिक असल्याबाबत मा.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांना सादर करण्यात यावे.

यापूर्वी नगर परिषद यवतमाळ मार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता नगर परिषद यवतमाळ अंतर्गत पथदिव्यांचे देखभाल व दुरुस्ती करीता विद्युत साहित्य खरेदी करणे करीता दि. १६/१२/२०२४ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. परंतु सदर निविदा संदर्भात रिट याचिका क्रमांक १२४०/२०२५, जयंत लक्ष्मीकांत चौपाने विरुध्द मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ व इतर, मा. उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल झालेली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. महाराष्ट्र नगर परिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (२ ) (अ ) नुसार सार्वजनिक रस्ते ,जागा व ईमारतीमध्ये दिवाबत्ती करणे हे नगर परिषदेचे आवश्यक कर्तव्य आहे.नागरिकांचे सोईकरिता यवतमाळ नगर परिषद क्षेत्रात प्रकाश व्यवस्था करणे आवश्यक असल्याने मे. कुळकर्णी अँड सन्स यवतमाळ यांची पथदिवे देखभाल व दुरुस्ती करणे करीता विद्युत साहित्य खरेदी करणे तसेच पथदिवे देखभाल व दुरुस्ती करणे,सार्वजनिक विजपेटीमधून पथदिवे चालू व बंद करणेबाबत, सन २०२४-२५ चे मंजूर निविदेतील दरास पुढील आदेशापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.याकरिता येणा-या संपूर्ण खर्चास हि सभा प्रशासकीय तथा वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येते. सदर खर्च नगर परिषद निधी/ नगर परिषद विकास निधी अंतर्गत करण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अध्यक्ष**
**नगर परिषद यवतमाळ**

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

सुचक :- सौ. चैताली बेलोकार
अनुमोदक :- सौ साधना काळे

**विषय क्रमांक - १२ :–** नगर परिषद यवतमाळ कार्यालयातील मा. नगराध्यक्ष व मा. उपाध्यक्ष तसेच विषय समिती सभापती यांचे केबिन (दालन) दुरुस्तीचे काम सुरु असून केलेल्या कामास नगर परिषद निधी मधून कार्योत्तर व प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेसाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर...

**ठराव क्रमांक – १२ :-** सदर विषय कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. यामध्ये यवतमाळ नगर परिषद कार्यालयातील मा. नगराध्यक्ष व मा. उपाध्यक्ष तसेच विषय समिती सभापती यांचे केबिन बरेच दिवसा पासून वापरात नसल्यामुळे व जुने असल्यामुळे तसेच प्रशासकीय कामकाज बैठका व मान्यवरांच्या भेटीसाठी आवश्यक सोई सुविधा उपलब्ध नसल्यामुळे सदर केबिनचे नूतनीकरण करणे अत्यावश्यक होते. तातडीची गरज लक्षात घेता सदर केबिन चे नूतनीकरणाचे काम रंगकाम, विद्युत काम, फर्निचर दुरुस्ती इत्यादी कामे सभेच्या पूर्व मंजुरीशिवाय करण्यात येत आहे. तरी मा. नगराध्यक्ष व मा. उपाध्यक्ष तसेच विषय समिती सभापती यांचे केबिन दुरुस्तीचे काम सुरु असून नगर परिषद निधी अंतर्गत कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव मा. सर्वसाधारण समिती सभेच्या निर्णयास सादर करण्यात येत आहेत. प्रस्तावित कामास मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रिक मंजूरी घ्यावी लागेल. सदर बाब मा. सभेच्या निर्देशनास आणुन दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेअंती सन्मानिय सदस्य श्री. चंद्रशेखर चौधरी, श्री. लोकेश इंगोले, श्री. बिपीन चौधरी, श्री. भरत ब्राम्हणकर , सौ साधना काळे ,सौ वैशाली सवाई, सौ. चैताली बेलोकार, यांनी सदर विषयास सहमती दर्शविली असुन विरोधी पक्ष नेता करीता सुद्धा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावा. अशी सुचना दिली.

उक्त नमुद विषयास नियमानुसार कार्यालयाने कार्यवाही करावी. असे ही सभा ठरवित आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर"

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्रमांक - १३ :-** यवतमाळ नगर परिषद अंतर्गत न.प. यवतमाळ हद्दीतील विविध रस्त्याच्या मध्ये असलेल्या डिव्हायडर (दुभाजकामध्ये) करण्यात आलेल्या वृक्षरोपणाची विविध प्रकारे निगा राखुन संगोपन करणेबाबत काम करण्यास्तव तसेच सदर कामाची निविदा प्रक्रीया करण्यास व सदरच्या कामी होणा-या खर्चास नगर परिषद निधीमधुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

**सूचक :- श्री. पंकज वसंतराव देशमुख**
**अनुमोदक :- श्री. भारत दिगांबर ब्राम्हणकर**

**ठराव क्रमांक - १३ :-** सदर विषयावर कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. सदर विषय कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आला. यवतमाळ नगर परिषद अंतर्गत यवतमाळ नगर परिषद हद्दीतील विविध ठिकाणी रस्त्याच्या मध्ये असलेल्या डिव्हायडर मध्ये वृक्ष लागवड करण्यात झाले आहे. त्याअनुषंगाने नगर परिषद यवतमाळ हद्दीतील रस्ताच्या मध्ये असलेल्या डिव्हायडर मध्ये करण्यात आलेल्या वृक्षरोपणास टँकरने पाणीपुरवठा करणे ग्रास कटिंग करणे, वाढलेले झाडे व झुडपे यांची कटाई करणे इत्यादी कामे सन 2024 मध्ये कंत्राटदारांना देण्यात आले होते सदर कामाची मुदत माहे सप्टेंबर 2025 ला संपली आहे.

खालील प्रमाणे कामे करणे गरजेचे असल्यामुळे सदर विषयावर सभेमध्ये चर्चा करण्यातआली.

| अ. क्र. | हद्दीतील वृक्षरोपण करण्यात आलेल्या डिव्हायडर चे नांव व स्थळ. प. |
|---|---|
| १ | पांढरकवडा रोडवर (किरण पेट्रोल पंपापासुन ते उडानपूल पर्यंत) ११३० चौ. मि. |
| २ | आर्णी रोडवर (विद्युत महावितरण कार्यालय ते वनवासी मंदीर पर्यंत) ४००० चौ. मि. |
| ३ | दारव्हा रोडवर (चिंतामणी पेट्रोल पंपापासुन ते लोहारा चौकपर्यंत) ३३०० चौ. मि. |
| ४ | भोसा रोडवर (गोल्डन पार्क रोडपासुन ते राष्ट्रीय महामार्ग चौकपर्यंत) १९१५ चौ. मि. |
| ५ | धामणगाव रोडवर (संविधान चौकापासुन ते मोहा फट्यापर्यंत) ४२९१ चौ. मी. |
| ६ | न.प. यवतमाळ हद्दीतील विविध रोड वरील रस्त्याच्या मध्ये असलेल्या डिव्हायडर (दुभाजकामध्ये) केलेल्या वृक्ष लागवडीच्या कापणी आणि देखभालीसाठी दोन बागायतदारांचा (माळी) पुरवठा करणे. |
| ७ | (लोहारा चौक ते पिंपळगांव पर्यंत बायपास रोडवर) ३३०० चौ. मि. |

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेमध्ये नगर सेवक श्री. पंकज वसंतराव देशमुख, सौ. वैशाली प्रवीण सवाई गटनेत्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, श्री.विशाल सुधाकर पावडे, श्री. अमोल ओंकारराव देशमुख श्री. लोकेश वसंतराव इंगोले, श्री.बिपीन अनिल चौधरी, श्री भारत दिगांबर ब्राम्हणकर, श्री. प्रमोद भास्कर बगाडे यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

वरील प्रमाणे झालेल्या चर्चेअंती उक्त कामे करण्यासाठी तसेच सदर कामाची निविदा प्रक्रीया करण्यास व सदरच्या कामी होणा-या खर्चास नगर परिषद निधीमधुन करण्यास्तव प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर"

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

## यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दि.०९/०२/२०२६

**विषय क्र. १४:-** यवतमाळ नगर परिषद हद्दीमधील तिरंगा चौकात ३० दुकाने आणि फूड कोर्ट व सार्वजनिक जागांचा समावेश असलेल्या सार्वजनिक प्लाझाचे प्रस्तावित बांधकाम करणे हे काम करण्याकरिता मंजुरी घेण्यासाठी मा. सर्वसाधारण समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्याबाबत..

**सूचक :- श्री. देविदास नामदेवराव अराठे**

**अनुमोदक :- श्री. नितीन उर्फ पिंटू बांगर**

**ठराव क्र. १४:-** सदर विषय कार्यालयीन टिपणीनुसार सभेमध्ये वाचण्यात आले. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने यवतमाळ नगर परिषद हद्दीमधील तिरंगा चौकात ३० दुकाने आणि फूड कोर्ट व सार्वजनिक जागांचा समावेश असलेल्या सार्वजनिक प्लाझाचे बांधकाम करणे हे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर काम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ३ कोटी १९ लाख रुपये खर्च होणे अपेक्षित आहे. सदर काम करण्याकरिता खनिज निधी मधून निधी मिळण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. वरील प्रस्तावित कामाअंतर्गत एकूण ३० दुकानाचे बांधकाम करण्यात येणार असून तिरंगा चौकात रस्तेच्या कडेला फूड कोर्ट डिजाईन करणे हे कामे प्रस्तावित आहे.

त्याअनुषगाने वरील विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. वरील विषयाचा अनुषगाने होत असलेल्या चर्चेमध्ये विरोधी पक्ष नेता सौ. वैशाली प्रवीण सवाई तसेच सन्माननीय न.प सदस्य श्री.नितीन उर्फ पिंटू बांगर, श्री. देविदास नामदेवराव अराठे, श्री. अमोल ओंकारराव देशमुख व श्री. पंकज नानवाणी यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सूचना स्वरुपात मत व्यक्त केले.

तरी सदर विषयावर झालेल्या चर्चेअंती वरील प्रकल्प कार्यान्वयित करण्यासाठी सुरवातीला नियोजन बद्ध व्यवस्था करावी असे मत सर्वानुमते कळविण्यात येत असल्याकारणाने सदर विषय सर्वानुमते नामंजूर करण्यात येत आहे .

"करिता ठराव सर्वानुमते नामंजूर"

(अॅड प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा

## दिनांक 09/02/2026

### तहकुब सभा दिनांक- 12/02/2026 रोजी पारित झालेला ठराव क्र- 15 ची प्रत

**विषय क्र:** १५ - नगर परिषद यवतमाळ अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरिता 01 नग मध्यम आकाराचे अग्निशमन वाहन खरेदी करणेसाठी व अत्याधुनिक अग्निशमन साहित्य खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) समितीकडे पाठविणेबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सविनय सादर.

**सुचक – श्री नित्यानंद अशोक गिरी**
**अनुमोदक - सौ. स्वाती अभिलाष खंडारे**

**ठराव क्र**१५ – उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर की, यवतमाळ शहराचे मोठ्या प्रमाणात नागरिकरण होत आहे. तसेच यवतमाळ नगर परिषदेची लोकसंख्या ही सन 2011 च्या जनगणनेनुसार 1,16,317 इतकी होती. त्यावेळी यवतमाळ शहराचे क्षेत्रफळ 10.17 चौ. कि एवढे होते. परंतू सन 2016 मध्ये नगर परिषद यवतमाळची हद्दवाढ झाली असून त्यामध्ये लगतच्या 07 ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे यवतमाळ नगर परिषदेचे क्षेत्रफळ 80.74 चौ.कि एवढे झाले आहे. त्याअनुषंगाने नगर परिषद क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वसाहती, गर्दीचे बाजारपेठ, महाविद्यालये, शाळा, पेट्रोलपंप, शॉपिंग मॉल, कॉटन जिनिग व प्रेसिंग इत्यादी अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत यवतमाळ नगर परिषदेचा अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाचे समर्थपणे कार्य करण्यासाठी बळकटीकरण व आधुनिक यांत्रिकीकरण होणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे पत्र क्र-मअसे-2021/32/516 दिनांक 06 मे 2021 च्या पत्रानुसार ज्या अग्निशमन वाहनाचे आयुष्य हे 5000 तास किंवा 10 वर्षे यापैकी जे आधी होईल अशी वाहने निर्लेखित करावी असे सदर पत्रात नमूद आहे. सद्यस्थितीत नगर परिषदेकडे अस्तित्वात असलेले 02 अग्निशमन वाहन कालबाह्य झालेले ठरत आहेत. उर्वरित 01 अग्निशमन वाहन पुढील दोन वर्षाने कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.

यवतमाळ शहर हे जिल्हा मुख्यालय असून व जिल्हयाचा विस्तार लक्षात घेता शहरात अतिमहत्वाच्या (व्ही.आय.पी) व्यक्ती, मान्यवरांचे दौरे कार्यक्रम नेहमी सुरू असतात. सदर अतिमहत्वाच्या (व्ही.आय.पी) व्यक्तीच्या ताफ्यात अग्निशमन वाहन सदैव सुसजित असणे अत्यत गरजेचे आहे. तसेच शहरातील अरूंद रस्ते, गल्ली बोळ यामध्ये होणा-या आगीच्या घटनासाठी मध्यम आकाराचे अग्निशमन वाहन असणे गरजेचे आहे. परंतू नगर परिषद यवतमाळ अग्निशमन विभागाकडे मध्यम क्षमतेचे अग्निशमन वाहन उपलब्ध नसल्यामुळे वेळोवेळी आणीबाणी सेवेत अडथळा येत आहे. त्यामुळे नगर परिषद अग्निशमन विभागासाठी 01 नग मध्यम आकाराचे अग्निशमन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांची तांत्रिक मान्यता 04/12/2023 रोजी प्राप्त झालेली आहे. तसेच अत्याधुनिक अग्निशमन साहित्य खरेदी करणेबाबत तांत्रिक मंजूरी प्राप्त होण्यासाठीचा प्रस्ताव मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार एक नग नवीन मध्यम आकाराचे अग्निशमन वाहन व अत्याधुनिक अग्निशमन साहित्य खरेदी करणेसाठी निधी मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर कामाकरिता निधी प्राप्त झाल्यानंतर विहित करण्यात आलेली निविदा प्रक्रिया करून वाहन व साहित्य खरेदी करण्याची प्रक्रिया करावी लागेल. त्याकरिता मा. सर्वसाधारण सभेची वित्तीय व प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्याकरिताचा प्रस्ताव येणा-या मा.

सर्वसाधारण सभेच्या पटलवार मंजूरीसाठी ठेवणे ठिक राहिल. सबब सदरचा विषय सभेसमोर ठेवण्यात आला होता.

वरीलप्रमाणे विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीचे सभेत वाचन करण्यात आले. त्यावर सर्वसाधारण सभेत विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांनी तांत्रिक मान्यता दिलेल्या स्पेशिफिकेशनप्रमाणे नगर परिषद अग्निशमन विभागासाठी 01 नग मध्यम आकाराचे अग्निशमन वाहने खरेदी करणेसाठी मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच नगर परिषद अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक अग्निशमन साहित्य खरेदी करणेसाठी सुध्दा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी करण्यात येत आहे. सदर कामासाठी आवश्यक असलेला निधी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत प्राप्त होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे पाठविण्यासाठी मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

पुढील कार्यवाहीचे आधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यात येत आहेत.

**" करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

(ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**यवतमाळ नगर परिषद यवतमाळ**

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९.०२.२०२६ रोजी ची स्थगित सभा दि. १२.०२.२०२६,**

**ठराव क्रमांक :- १६**

सूचक :श्री. भारत दिगांबर ब्राम्हणकर
अनुमोदक :सौ. वैशाली प्रविण सवाई

**विषय १५** महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, २०१० नुसार नगर परिषदेत १० सुरक्षा गार्ड नियुक्त करण्याबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सविनय सादर..

**ठराव :१६** महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, २०१० च्या प्रस्तावनेनुसार, दहशतवादी संघटना, समाजविघातक घटक व अंडरवर्ल्ड गुन्हेगारांच्या धमक्यांना तोंड देण्यासाठी एका सक्षम दलाची उभारणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, २०१० (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-१०-१, एप्रिल १९, २०१० / चैत्र २९, शके १९३२) अन्वये करण्यात आलेली आहे. यामुळे राज्य शासन व केंद्र शासनाची कार्यालये, उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, प्रमुख प्रतिष्ठापना, वित्तीय संस्था, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैद्यकीय संस्था; तसेच शासनाशी संयुक्त करार करून नगर परिषद यवतमाळ येथे सुसज्ज मनुष्यबळामार्फत व्यावसायिक सुरक्षा सेवा पुरवणे, तंत्रविषयक सल्ला देणे व संरक्षण सुदृढ करणे आवश्यक आहे.

नगर परिषद यवतमाळ ही शासकीय संस्था असल्याने, सदर महामंडळाच्या सेवा घेऊन परिषदेच्या कार्यालये, उपक्रम व कर्मचाऱ्यांचे संरक्षण सुदृढ करणे कायदेशीर व आवश्यक आहे. विशेषतः नगर परिषद यवतमाळमार्फत काढण्यात येणाऱ्या अतिक्रमण मोहिमा, इतर आवश्यक सभा किंवा प्रशिक्षण करिता यवतमाळ नगर परिषदेत एकूण १० सुरक्षा गार्ड नियुक्त करण्याचा प्रस्ताव असून, प्रत्येक गार्डचे मानधन ₹२८,००० प्रति महिना आहे. एकूण वार्षिक खर्च: ₹ ३३,६०,००० (१० गार्ड × ₹२८,००० × १२ महिने) प्रमाणे सुरक्षा गार्डांची आवश्यकता आहे. प्रस्ताव आस्थापना विभाग प्रमुख यांनी वाचन केले.

विशेषतः नगर परिषद यवतमाळमार्फत काढण्यात येणाऱ्या अतिक्रमण मोहिमा किंवा इतर व्यवस्थेकरिता सुरक्षा गार्ड नियुक्त करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी आवश्यक असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये सौ. वैशाली प्रवीण सवाई गटनेता तथा नगर सेविका, श्री. नित्यानंद गिरी गटनेता भाजप, नगरसेवक सौ. चैताली निलेश बेलोकर गटनेता शिवसेना तथा नगरसेविका तसेच श्री. भारत ब्राम्हणकर नगरसेवक यांनी सूचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, नगर परिषद यवतमाळमार्फत काढण्यात येणाऱ्या अतिक्रमण मोहिमा, इतर आवश्यक व्यवस्थेकरिता यवतमाळ नगर परिषदेत एकूण ०५ सुरक्षा गार्ड नियुक्त करण्यासाठी चर्चे अंती निर्णय झाल्याने, प्रत्येक गार्डचे मानधन ₹२८,००० प्रति महिना प्रमाणे एकूण वार्षिक खर्च: ₹ १६,८०,००० (०५ गार्ड × ₹२८,००० × १२ महिने) प्रमाणे नियुक्त करण्याची कार्यवाही करण्याबाबत आस्थापना विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांच्या आदेशानुसार कार्यवाही करावी. याबाबत येणारा संपूर्ण खर्च नगर परिषदेच्या स्वउत्पन्नातून भागविण्यात यावा,

ठराव सर्वानुमते मंजूर.....

(सही)

**(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)**
**नगराध्यक्ष**
**नगर परिषद यवतमाळ**

**यवतमाळ नगर परिषद यवतमाळ**

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९.०२.२०२६ रोजी ची स्थगित सभा दि. १२.०२.२०२६,**

**ठराव क्रमांक :- १७**

सूचक : सौ. अर्चना दिनेश चिडाले

अनुमोदक : ॲड. आनंद बळीराम गायकवाड

**विषय :१८** – नगर परिषद यवतमाळ मधील जमादार, मुकादम व सफाई कर्मचारी यांना १०/२०/३० वर्षांनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अदा करून थकबाकी अदा करणे बाबत होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत.

**ठराव१८** – नगरपरिषदेतील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठितता दूर करण्याच्या दृष्टीने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि. २७/०९/२०१७ रोजीच्या नगर विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार यापूर्वी लागू करण्यात आली आहे. तसेच, राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग कर्मचारी व नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या दि. ०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित केलेली तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना नगर विकास विभागाच्या दि. ११.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली असून, याबाबत नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश नगर परिषद यवतमाळ येथे प्राप्त झाले आहेत.

वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९ नुसार राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना १०/२०/३० वर्षांनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची आश्वासित प्रगती योजना केंद्र शासनाच्या धर्तीवर लागू करण्यात आली असून, सदर योजना राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग कर्मचारी व नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी वित्त विभागाचे शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९, दि. ०१.०२.२०२०, दि. ०७.१०.२०२२ व दि. २१.०२.२०२४ मधील तरतुदीप्रमाणे कार्यपद्धती, विहित निकष व अनुज्ञेयता लागू राहतील. सदर सुधारित योजना दि. ०१.०१.२०१६ पासून लागू राहील व दि. ०१.०१.२०१६ ते आदेशाच्या दिनांकापर्यंत म्हणजे दि. ११.०९.२०२४ पर्यंत काल्पनिक वेतननिश्चिती करून प्रत्यक्ष लाभ व थकबाकी या आदेशाच्या दिनांकापासून देण्यात येतील; तथापि, आदेशाच्या पूर्वीची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही. यासाठी येणारा खर्च नगरपरिषदेच्या स्वउत्पन्नातून भागवण्यात येईल, असे निर्देश आहे.

नगर परिषद यवतमाळमधील जमादार, मुकादम व सफाई कर्मचारी यांना स्थायी निर्देश क्रमांक २०-अ मधील मुद्दा क्रमांक ०३ नुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना मंजूर करण्याचे अधिकार मुख्याधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. यवतमाळ नगर परिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत व सेवानिवृत्त जमादार, मुकादम व सफाई कर्मचारी यांना वित्त विभागाचे शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९, दि. ०१.०२.२०२०, दि. ०७.१०.२०२२ व दि. २१.०२.२०२४ तसेच नगर विकास विभागाचा शासन निर्णय दि. ११.०९.२०२४ मधील तरतुदींनुसार व उक्त स्थायी निर्देशानुसार १०/२०/३० वर्षांनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत मुख्याधिकाऱ्यांना अधिकार आहेत. प्रस्ताव आस्थापना प्रमुख यांनी प्रस्ताव वाचन केला.

सभेत सदर योजनेअंतर्गत प्रलंबित प्रकरणांवर संपूर्ण कार्यवाही करून संबंधित कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय लाभ अदा करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी आवश्यक असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, नगर परिषद यवतमाळमधील जमादार, मुकादम व सफाई कर्मचारी यांना द्यावयाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ मंजूर करण्याचे अधिकार मुख्याधिकाऱ्यांना स्थायी निर्देश क्रमांक २०-अ (मुद्दा क्र. ०३) प्रमाणे प्रदान करण्यात आलेले असल्याने, मुख्याधिकारी यांनी आस्थापना विभाग प्रमुख यांना सदर योजनेअंतर्गत सर्व प्रलंबित प्रकरणे व चालू प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्याबाबत आदेश निर्गमित करावेत. तसेच, याबाबत येणारा संपूर्ण वित्तीय खर्चास मान्यता देण्यात येते, याकरिता मुख्याधिकाऱ्यानी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश आस्थापना विभाग प्रमुख यांना निर्गमित करावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.....

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
नगराध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**यवतमाळ नगर परिषद यवतमाळ**

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९.०२.२०२६ रोजी ची स्थगित सभा दि. १२.०२.२०२६,**

**ठराव क्रमांक :- १८**

**सूचक** श्री. विलास उर्फ दत्ता कुलकर्णी

**अनुमोदक** : सौ. मिना राहुल मस्सराम

**विषय१८** नगर परिषद यवतमाळ मधील गट-क व गट-ड कर्मचारी यांना १०/२०/३० वर्षांनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अदा करून थकबाकी अदा करणे बाबत होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत.

**ठराव१८:** नगरपरिषदा/नगरपंचायतील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठितता घालविण्याच्या दृष्टीने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि. २७/०९/२०१७ रोजीच्या नगर विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये यापूर्वी लागू करण्यात आली आहे. तसेच राज्यातील राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग कर्मचारी व नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या दि. ०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेली तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना नगर विकास विभागाच्या दि.११.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली असून याबाबत नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश नगर परिषद कार्यालयास प्राप्त आहेत.

वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९ नुसार राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना १०/२०/३० वर्षांनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची आश्वासित प्रगती योजना केंद्र शासनाच्या धर्तीवर लागू करण्यात आली असून, सदर योजना राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग कर्मचारी व नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांना खालील अटींखाली लागू करण्यात मान्यता देण्यात आली आहे:

१. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात वित्त विभागाचे शासन निर्णय दि.०२.०३.२०१९, दि.०१.०२.२०२०, दि.०७.१०.२०२२ व दि.२१.०२.२०२४ मधील तरतुदीप्रमाणे कार्यपद्धती, विहित निकष व अनुज्ञेयता लागू राहतील.
२. सदर सुधारित योजना दि. ०१.०१.२०१६ पासून लागू राहील; दि. ०१.०१.२०१६ ते आदेशाच्या दिनांकापर्यंत काल्पनिक वेतननिश्चिती करून प्रत्यक्ष लाभ आदेशाच्या दिनांकापासून देण्यात येतील, तथापि थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.
३. यासाठी येणारा खर्च नगरपरिषदेने स्वउत्पन्नातून भागविण्यात यावा.

यवतमाळ नगर परिषदेत वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यापूर्वी गठीत समितीची पूर्वमंजुरी आवश्यक असली तरी मंजूर आकृतिबंध सन २००६ मधील असल्याने (सध्या २० वर्षे जुना) व ग्रामपंचायतींच्या समावेशामुळे कामाचा व्याप वाढल्याने मनुष्यबळाची कमतरता उत्पन्न झाली आहे. परिणामी, पात्र कर्मचारी सेवानिवृत्त होऊनही लाभ मिळाला नाही.

या पार्श्वभूमीवर एक विशेष बाब म्हणून यवतमाळ नगर परिषदेतून सेवानिवृत्त झालेले वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अदा करण्यास मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच, सध्या कार्यरत व यापुढील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी गठीत समितीची पूर्वमंजुरी घेणे बंधनकारक राहील. प्रस्ताव आस्थापना प्रमुख यांनी प्रस्ताव वाचन केला.

सभेत सदर योजनेअंतर्गत प्रलंबित प्रकरणांवर संपूर्ण कार्यवाही करून संबंधित कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय लाभ अदा करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी आवश्यक असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, सदर योजनेअंतर्गत प्रलंबित प्रकरणांवर संपूर्ण कार्यवाही करून संबंधित कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय लाभ अदा करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी आवश्यक असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, नगर परिषद यवतमाळमधील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी यांना द्यावयाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ एक विशेष बाब म्हणून सर्व प्रलंबित (सेवानिवृत्त वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी) यांना अदा करावेत. याबाबत येणारा संपूर्ण वित्तीय खर्चास मान्यता देण्यात येते, याकरिता मुख्याधिकाऱ्यानी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश आस्थापना विभाग प्रमुख यांना निर्गमित करावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.....

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
**नगराध्यक्ष**
**नगर परिषद यवतमाळ**

यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ

सर्वसाधरण सभा दि.09/02/2026 रोजीची स्थगित सभा दिनांक 12/02/2026

विषय क्र. 19: नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील पाणीपुरवठा विभाग अंतर्गत संपूर्ण शहरातील झोन क्रमांक 1 ते 4 व वाढीव क्षेत्रासह सार्वजनिक हातपंपांची साहित्यसह दुरुस्तीच्या कामाची वार्षिक निविदा राबविणेबाबत व त्यासाठी होणाऱ्या खर्चास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

सुचक -श्री. विपुल पद्माकर खोब्रागडे

अनुमोदक -सौ. माया मोतीलाल थोरे

ठराव 19 :- सदर विषय कार्यालयीन टीप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील पाणीपुरवठा विभाग अंतर्गत संपूर्ण शहरातील झोन क्रमांक १ ते ४ व वाढीव क्षेत्रातील सार्वजनिक हातपंपांची साहित्यसह दुरुस्ती करणे ही सातत्याने व तातडीने करणे आवश्यक असते. सदर कामे सुरळीत व वेळेत पार पाडण्यासाठी वार्षिक निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. सदर वार्षिक कामाच्या अनुषंगाने येणाऱ्या अंदाजित खर्चास नगरपरिषद सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळावी असे मत विभाग प्रमुख कर विभाग तसेच मुख्याधिकारी यांनी मांडले.

यावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये नगरसेवक तथा गटनेता भाजपा श्री. नित्यानंद अशोक गिरी, नगरसेवक श्री. चंद्रशेखर चौधरी, नगरसेवक श्री. श्रीकृष्ण कांबळे, नगरसेवक श्री. लोकेश इंगोले, नगरसेवक श्री. बिपीन चौधरी, नगरसेवक श्री. पंकज देशमुख, नगरसेविका तथा गटनेत्या क्रांग्रेस सौ. वैशाली प्रविण सवाई, यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चेअंती नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील पाणीपुरवठा विभाग अंतर्गत संपूर्ण शहरातील झोन क्रमांक 1 ते 4 व वाढीव क्षेत्रासह सार्वजनिक हातपंपांची साहित्यसह दुरुस्तीच्या कामाची वार्षिक निविदा राबविणेबाबत व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. पुढील कार्यवाही विभाग प्रमुख यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी अशी ही सभा ठरवते.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद, यवतमाळ

**नगर परिषद यवतमाळ सर्वसाधारण सभा दिनांक ०९ /०२/२०२६ चे सभेतील ठराव क्रं. २१ ची प्रत.....**

यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ
सर्वसाधरण सभा दि.09/02/2026 रोजीची स्थगित सभा दिनांक 12/02/2026

विषय क्र. 20: नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील पाणीपुरवठा विभाग अंतर्गत संपूर्ण शहरातील झोन क्रमांक 1 ते 4 व वाढीव क्षेत्रासह सार्वजनिक मोटर पंप दुरुस्ती (इलेक्ट्रिकल साहित्यसह), पाईपलाईन लिकेज तसेच इतर किरकोळ साहित्य दुरुस्तीच्या कामाची वार्षिक निविदा राबविणेबाबत व त्यासाठी होणाऱ्या खर्चास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

सुचक -श्री. चंद्रशेखर हरीकेश्व चौधरी
अनुमोदक -सौ. शोभा उध्दवराव साळवे

ठराव 20 :- सदर विषय कार्यालयीन टीप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. नगरपरिषद यवतमाळ पाणीपुरवठा विभाग अंतर्गत शहरातील झोन क्रमांक 1 ते 4 तसेच वाढीव क्षेत्रामध्ये सार्वजनिक मोटर पंपांची दुरुस्ती, इलेक्ट्रिकल साहित्याची दुरुस्ती/बदल, पाईपलाईन लिकेज दुरुस्ती व इतर किरकोळ साहित्याच्या दुरुस्तीची कामे ही सातत्याने व तातडीने करणे आवश्यक असते. सदर कामे सुरळीत व वेळेत पार पाडण्यासाठी वार्षिक निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. सदर वार्षिक कामाच्या अनुषंगाने येणाऱ्या अंदाजित खर्चास नगरपरिषद मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळावी असे मत विभाग प्रमुख कर विभाग तसेच मुख्याधिकारी यांनी मांडले.

यावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये नगरसेवक श्री. श्रीकृष्ण कांबळे, नगरसेवक श्री. विशाल कांबळे यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चेअंती नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील पाणीपुरवठा विभाग अंतर्गत संपूर्ण शहरातील झोन क्रमांक 1 ते 4 व वाढीव क्षेत्रासह सार्वजनिक मोटर पंप दुरुस्ती (इलेक्ट्रिकल साहित्यसह), पाईपलाईन लिकेज तसेच इतर किरकोळ साहित्य दुरुस्तीच्या कामाची वार्षिक निविदा राबविणेबाबत व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. पुढील कार्यवाही विभाग प्रमुख यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी अशी ही सभा ठरवते.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

PAvike

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

**नगर परिषद यवतमाळ सर्वसाधारण सभा दिनांक ०९ /०२/२०२६ चे सभेतील ठराव क्रं. २१ ची प्रत.....**

विषय क्रं.२१ - यवतमाळ नगर परिषद हद्दीतील बाबाजी दाते कॉलेजच्या उत्तरेकडील प्रस्तावित १८ मी.रूंद विकास योजना चा रस्ता रूंदीकरणसाठी आवश्यक जागा भुसंपादनकरणे बाबत......

सुचक - श्री नित्यानंद अशोक गिरी

अनुमोदक - श्री.सुभाष दयाराम राय

ठराव क्रं.२१ - यवतमाळ शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ खाली शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्रं.टिपीएस-२७९५/१६००/सीआर-२५२/युडी-१३,दि.८/७/१९९८ अन्वये मंजूर करण्यांत आली आहे. तसेच या कार्यर्कालयाचे पत्र क्रं. १४३६,दिनांक २८/३/२०२५ अन्वये प्रारूप विकास योजना यवतमाळ(मुळ हद्द अधिक दु.सु व वाढीव क्षेत्र) शासनाच्या मंजुरीस्तव सादर करण्यांत आली आहे. या विकास योजने मध्ये शहराची गरज विचारात घेऊन विविध रस्त्यांचे विकास कामाकरीता काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियंत्रणामध्ये डिपीडीसी फंडामधुन मंजुर करण्यांत आले असून कामे पूर्ण झालेली आहे. सदर रस्ता रूंदीकरणामध्ये दाते कॉलेज या संस्थेची खाजगी जागा १८ मिटर डि.पी.रस्त्याचे रूंदीकरणाचे कामामध्ये आवश्यक असल्याने ती जागा वित्तीय मोबदला किंवा टि.डी.आर. या स्वरूपामध्ये भुसंपादन करण्याकरीता सदरचा विषय सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यांत येत आहे.

म.प्रा.नि.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदीनुसार शासकिय कामाकरीता खालील जंमिनीचे मालकांना वित्तय स्वरूपामध्ये किंवा टि.डी.आर. अंतर्गत जमिन नगर परिषदेला मोबदल्यामध्ये हस्तांतरीत करण्याच्या बदल्यात टिडीआर किवा रक्कम देणे बाबतचा प्रस्ताव देण्यांत येईल. सदरची भुसंपादनाची कार्यवाहीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे विहीत नमुन्यामध्ये यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

विकास योजना तयार करणे व विकास योजने अंतर्गत जमिनीचे भुसंपादन करणे या लेखा शिर्षा खाली विकास निधीची तरतुद करण्यांत आली आहे. तसेच सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकामध्ये सुध्दा वाढीव तरतुद करून टप्या-टप्याने भुसंपादना करीता निधी उपलब्ध करता येईल. असे मुख्याधिकारी यांनी सभेमध्ये व्यक्त केले. सदर विषयावर सभेमध्ये विस्तुत चर्चा करण्यांत आली.

यवतमाळ नगर परिषदेची मंजुर विकास योजना (सु) यवतमाळ मधील दाते कॉलेजची खाजगी जागा वित्तीय स्वरूपामध्ये किंवा टि.डी.आर.स्वरूपामध्ये अंतर्गत उपरोक्त नमुद जमिनीचे भुसंपादनाचे प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते प्रस्ताव नामंजुर करण्यांत आला.

"ठराव सर्वानुमते नामंजुर"

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोकराव उईके)
नगराध्यक्षा,
नगर परिषद,यवतमाळ

## मा. सर्व साधारण सभा दि.०९/०२/२०२६ रोजीची ची स्थगित सभा दि.१२/०२/२०२६

## ठराव क्र.२२ ची सत्यप्रत

विषय क्र.२२ :- मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ निधी अंतर्गत विविध प्रभागामध्ये सोलर हायमास्ट उभारणी करणे या कामास येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी प्रदान करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

सूचक :- मा.श्री. भारत दिगंबर ब्राम्हणकर

अनुमोदक :-मा. श्रीमती.वैशाली प्रवीण सवाई

ठराव क्र.२२ :- सदर विषयाची नस्ती सभेमध्ये पाहण्यात आली व विद्युत नगर अभियंता यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली मा. आमदार स्थानिक विकास विकास निधी अंतर्गत यवतमाळ न.प अंतर्गत विविध प्रभागा मध्ये सोलर हायमास्ट उभारणी करणे बाबत चे पत्र जिल्हा नियोजन समिती , जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचे कडून i- pas प्रणाली वर प्रस्ताव सादर करणे बाबत प्राप्त झाले आहेत. प्रस्तावित कामे खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१७ येथे श्री.संजय गावंडे यांचे घरा जवळ नगर परिषदेच्याखुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| २ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.२३ नरेंद्र नगर येथे श्री.राजेश बोकरे यांचे घरा जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ३ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१५ जय विजय चौक येथे श्री.कांबळे यांचे घरालगत असलेल्या बजरंग वली मंदिर जवळील नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ४ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१२ येथिल अहिल्याबाई होळकर स्मारकाचे परिसरातील नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ५ | नगर परिषद हद्दीतील जि.प शाळा वडगाव येथील नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ६ | नगर परिषद हद्दीतील दर्डा नगर प्राध्यापक कॉलोनी येथील मालानी कॉम्प्लेक्स जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ७ | नगर परिषद हद्दीतील शिवराज व्यायाम शाळेच्या बाजूला श्री. भास्कर मेहरे यांच्या घरा जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ८ | नगर परिषद हद्दीतील स्टेट बँक चौक जवळील ख्रिस्त कब्रस्थान मध्ये सोलर हायमास्ट उभारणे |
| ९ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१५ येथे श्री. सुरेश अलोणे यांच्या घरा जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| १० | नगर परिषद हद्दीतील चांदोरे नगर पहूर ग्रा.पं पुनर्वसन मधील गजाजन महाराज मंदिरा जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| ११ | नगर परिषद हद्दीतील जगनाडे महाराज मंदिर जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| १२ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१७ येथे श्री.अनिल पांडे यांच्या घरा जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| १३ | नगर परिषद हद्दीतील शिवनेरी सोसायटी येथील श्री. तुकाराम राउत यांच्या घरा जवळ सोलर पनेल व सोलर हायमास्ट उभारणे |
| १४ | नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१९ मधील आठवडी बाजारा मधील अणुशक्ती व्यायाम शाळे कडून जाणारया प्रवेश द्वारा जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| १५ | नगर परिषद हद्दीतील बाजोरिया नगर येथील ज्ञानेश्वर मंदिर जवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |
| १६ | नगर परिषद हद्दीतील दर्डा नगर प्राध्यापक कॉलोनी येथील श्री. कोठेकर यांच्या घराजवळ नगर परिषदेच्या खुल्या जागेत सोलर हायमास्ट उभारणे |

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन i-pass प्रणाली वर प्रशासकीय मान्यते करीता सादर करणे करण्या करिता तसेच सदर काम करण्यास येणाऱ्या खर्चास हि सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करते.पुढील कार्यवाही विद्युत विभागाने मुख्याधिकारी यांच्या आदेशाने पार पाडावी असे ही सभा ठरविते.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

( प्रियदर्शिनी अशोक उईके)
अध्यक्षा
यवतमाळ नगर परिषद यवतमाळ

# मा. सर्व साधारण सभा दि.०९/०२/२०२६ रोजीची ची स्थगित सभा दि.१२/०२/२०२६ ठराव क्र.२३ ची सत्यप्रत

विषय क्र.२३ :— नगर परिषद यवतमाळ अंतर्गत न.प.शाळा , न.प.प्रशासकीय ईमारती न.प.च्या खुल्या जागेत पारेषण संलग्न सौर उर्जा प्रकल्प आस्थापित करणे या कामास येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी प्रदान करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

सुचक:— मा.श्री. बिपीन अनिल चौधरी
अनुमोदक:— मा. लोकेश वसंतराव इंगोले

ठराव क्र.२३ :- सदर विषयाची नस्ती सभेमध्ये पाहण्यात आली व त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली नगर परिषद यवतमाळ अंतर्गत कार्यरत असलेल्या न.प. शाळा व विविध न.प. इमारतींमध्ये विद्युत ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून त्यावर होणारा खर्च नगर परिषदेच्या नियमित खर्चात लक्षणीय आहे. पारंपरिक विद्युत ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून पर्यावरणपूरक व शाश्वत ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविण्याबाबत शासनामार्फत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेले आहेत.

सदर संदर्भात शासन निर्णय, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०२५/प्र.क्र.-१९/नवि-१६(ई-९३१९६४०) दिनांक 29 एप्रिल 2025 नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना ,पाणीपुरवठा योजना, मलजल प्रक्रिया केंद्र , घनकचरा प्रकल्प , पथदिवे ,प्रशासकीय ईमारती इत्यादी ठिकाणी पारेषण संलग्न (Rooftop / On-grid) सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुषंगाने नगर परिषद यवतमाळ अंतर्गत असलेल्या न.प. शाळा व न.प. इमारतींच्या परिसरास संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. या प्रकल्पांमुळे वीज खर्चात बचत होणार असून दीर्घकालीन आर्थिक लाभ प्राप्त होईल. तसेच कार्बन उत्सर्जनात घट होऊन पर्यावरण संरक्षणास हातभार लागेल.

सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित केल्यास दिवसा निर्माण होणारी वीज थेट वापरात आणता येईल तसेच शासनाच्या धोरणानुसार नेट मीटरिंगद्वारे अतिरिक्त वीज ग्रिडमध्ये समायोजित करता येईल. सदर प्रकल्प शाळा व सार्वजनिक इमारतींसाठी उपयुक्त असून अक्षय ऊर्जेबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत होईल.

तरी शासन निर्णय, दिनांक 29 एप्रिल 2025 (नगर विकास विभाग) मधील तरतुदींनुसार नगर परिषद यवतमाळ अंतर्गत पाणीपुरवठा योजना, मलजल प्रक्रिया केंद्र , घनकचरा प्रकल्प , पथदिवे ,न.प.शाळा ,प्रशासकीय ईमारती इत्यादी ठिकाणी पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याबाबत तांत्रिक पाहणी करणे, आवश्यक क्षमतेचा (kW) प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करणे तांत्रिक सल्लागार नेमणे तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील कार्यवाही करण्या करिता व येणाऱ्या खर्चास हि सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करते.पुढील कार्यवाही विद्युत विभागाने मुख्याधिकारी यांच्या आदेशाने पार पाडावी असे ही सभा ठरविते.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

( प्रियदर्शिनी अशोक उईके)
अध्यक्षा
यवतमाळ नगर परिषद यवतमाळ

# यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ

सर्वसाधरण सभा दि.०९/०२/२०२६ रोजीची स्थगित सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्र. २४ :- यवतमाळ नगर परीषद हद्दीतील थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफी बाबतच्या अभय योजने अंतर्गत प्राप्त प्रस्तावांना मंजुरी देणे बाबत माहितीस सादर.**

सुचक -श्री. सुभाष तुकाराम राय

अनुमोदक श्री. अन्सारी जावेद परवेज अब्दुल समद

ठराव २४ :- सदर विषय कार्यालयीन टीप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एम यु एम -२०२५ /प्र क्र.७० /नवि-१७ दिनांक १९/०५/२०२५ .नुसार राज्य शासनाने नगरपालिका /नगरपरिषदा व नगर पंचायत क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करून कर वसूल करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अभय योजना सुरु केली आहे.

त्यानुसार शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांका पर्यंत म्हणजेच १९/०५/२०२५ पावेतोच्या नगर परिषद मधील थकीत असलेल्या सर्व शास्तीच्या माफीसाठी मा.जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव सादर करणे बाबत नमूद आहे.त्यानुसार जिल्हाधिकारी ५० टक्के पर्यंत च्या शास्ती माफी प्रस्ताव बाबत ३० दिवसात निर्णय व ५० टक्के पेक्षा अधिक शास्ती माफी साठी मा.जिल्हाधिकारी यांनी सदर प्रस्ताव अभिप्रायासह मा.आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना सादर करावयाचे आहेत.सदर प्रस्ताव मा.आयुक्त तथा संचालक शिफारसीसह राज्य शासनास सादर करतील आहे नमूद आहे.

सदर शास्ती माफी बाबतची अभय योजना नगर परिषद यवतमाळ हद्दीतील मालमत्ता धारक यांना सुद्धा लागू करावयाची असल्यामुळे सदर अभय योजने अंतर्गत येणारे अर्ज प्रस्ताव यांना मा.जिल्हाधिकारी तसेच राज्य शासनच्या मंजुरीसाठी पाठविणे,तसेच अभय योजने अंतर्गत आलेल्या अर्जानुसार ( ५० टक्के शास्ती माफी साठी अर्ज असेल तर ५० टक्के ,१०० टक्के शास्ती माफी साठी अर्ज असेल तर १०० टक्के) शास्ती माफी ला सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळावी.असे मत विभाग प्रमुख कर विभाग तसेच मुख्याधिकारी यांनी मांडले.

यावर सभे मध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये नगरसेवक तथा गटनेता भाजपा श्री. नित्यानंद अशोक गिरी, नगरसेविका तथा गटनेत्या क्रांग्रेस सौ. वैशाली प्रविण सवाई, यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चे अंती दिनांक १९/०५/२०२५ चे शासन निर्णय प्रमाणे ५० टक्के व १०० टक्के शास्ती माफी बाबतचे आलेले सर्व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.पुढील कार्यवाही विभाग प्रमुख यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी अशी ही सभा ठरवते.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

PAuike

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद ,यवतमाळ

# यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दि.०९/०२/२०२६

विषय क्र. २५ :- प्रधानमंत्री आवास योजना-शहरी २.० भागीदारी तत्वावर परवडणारी घरे(AHP) घटकाअंतर्गत मौजा वडगाव रोड नगर परिषद हद्द सर्व्हे नं. ६५ व मौजा यवतमाळ नगर परिषद हद्द सर्व्हे नं. ४९/२ या जागेवर मंजूर प्रकल्प कार्यान्वयित करण्याकरिता प्रकल्प सल्लागार समितीची नेमणूक करण्याकरिता मंजुरी मिळणेबाबत.

**सूचक :- श्री. भारत दिगांबर ब्राम्हणकर**

**अनुमोदक :- श्री. नित्यानंद अशोक गिरी**

ठराव क्र. २५:- सदर विषय कार्यालयीन टिपणीनुसार सभेमध्ये वाचण्यात आले. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने यवतमाळ नगर परिषद बांधकाम विभागाला प्रधानमंत्री आवास योजना-शहरी २.० भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (AHP) घटकाअंतर्गत मौजा वडगाव रोड नगर परिषद हद्द सर्व्हे नं. ६५ या जागेवर ४६९ EWS घरकुलांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. तसेच मौजा वडगाव रोड नगर परिषद हद्द सर्व्हे नं. ४९/२ या जागेवर ५१५ EWS व ३१९ LIG घरकुलांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. सदर प्रकल्प कार्यान्वयित करण्याकरिता सदर प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेणे, ई-निविदा प्रक्रिया करण्याकरिता निविदा कागदपत्रे करणे, निविदा प्रक्रिया झाल्यानंतर निविदा कागदपत्रांची छाननी करणे तसेच सदर प्रकल्पाचे बांधकाम करते वेळी पर्यवेक्षण करणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होत पर्यंत प्रकल्प सल्लागार समितीची नेमणूक करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रकल्प कार्यान्वयित करणे सोईचे होईल.

त्याअनुषगाने वरील विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. वरील विषयाचा अनुषगाने होत असलेल्या चर्चेमध्ये विरोधी पक्ष नेता सौ. वैशाली प्रवीण सवाई तसेच सन्माननीय न.प सदस्य श्री.भारत दिगांबर ब्राम्हणकर, श्री. नित्यानंद अशोक गिरी व अन्सारी जावेद परवेज अब्दुल समद यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सूचना स्वरुपात मत व्यक्त केले.

तरी सदर विषयावर झालेल्या चर्चेअंती वरील मंजूर प्रकल्प कार्यान्वयित करण्यासाठी प्रकल्प सल्लागार समितीची नेमणूक करणे हे काम हे नगर परिषद निधी मधून करण्याकरिता सर्वानुमते वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

"करिता ठराव सर्वानुमते मंजूर"

(ॲड प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्रमांक - २६ :-** यवतमाळ नगर परिषद हद्दीतील राष्ट्रसंत/थोर महापुरुषांच्या पुतळ्या लगत असलेले अतिक्रमण काढुन त्या ठिकाणी सौंदर्यीकरण करणेबाबत कामे करण्यास्तव तसेच सदर कामाची निविदा प्रक्रीया करण्यास व सदरच्या कामी होणा-या खर्चास नगर परिषद निधीमधुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

**सूचक :- श्री. नित्यानंद अशोक गिरी**
**अनुमोदक :- श्री. भारत दिगांबर ब्राम्हणकर**

**ठराव क्रमांक - २६ :-** सदर विषयावर कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. यवतमाळ नगर परिषद हद्दीतील राष्ट्रसंत/थोर महापुरुषांच्या पुतळ्या लगत असलेले अतिक्रमण काढुन त्या ठिकाणी सौंदर्यीकरण करणेबाबत काम करण्यास्तव तसेच सदर कामाची निविदा प्रक्रीया करण्यास व सदरच्या कामी होणा-या खर्चास नगर परिषद निधीमधुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत सदरचा विषय सभेसमोर ठेवण्यात आला.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये श्री. अमोल ओंकारराव देशमुख गटनेते भारतीय जनता पार्टी, सौ. वैशाली प्रवीण सवाई गटनेत्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, श्री भारत दिगांबर ब्राम्हणकर, श्री. चंद्रशेखर हरीकेशव चौधरी, सौ. चैताली निलेश बेलोकर, श्री. प्रमोद भास्कर बगाडे, श्री.आनंद बळीराम गायकवाड, दिलीप काळे यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

वरील चर्चेअंती अतिक्रमण काढण्याकरिता न.प.यवतमाळ येथील अतिक्रमण विभाग यांची मदत घेऊन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. त्यानुषंगाने येणाऱ्या खर्चास नगर परिषद निधी मधुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

''करीता ठराव सर्वानुमते मंजूर''

PAuilu

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ ची स्थगित सभा दिनांक १२/०२/२०२६**

**ठरावाची प्रत – विषय क्रमांक २७**

विषय :- २८ सन २०२६-२७ करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागा अंतर्गत होणा-या विविध कार्यक्रमा करीता तसेच विविध सभेकरीता संपुर्ण बिछायत व्यवस्था, साऊंड सिस्टीम, मडंप डेकोरेशन व इतर अनुषंगीक व्यवस्था करण्याकरीता वर्षभर लागणा-या संबंधीत वस्तु भाडे तत्वावर लावने च्या कामची ई- निविदा प्रक्रिया राबवून दर मागविणे तसेच होणा-या वार्षिक खर्चास वित्तिय व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.

सूचक - विजय दयाराम राय
अनुमोदक - अन्सारी जावेद परवेज अब्दुल समद

ठराव :- २८

सादर करण्यात येते कि, यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ कार्यालयात वर्षभरात विविध विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जातेसदर कार्यक्रमाकरीता आवश्यक मंडप बिछायत व्यवस्था व . .साऊंड व्यवस्था करण्यात येतेमागील २०२५-२६ ची निविदांची कालावधी संपणार आहे. त्यासाठी दर वर्षी ई - निविदा प्रक्रियाराबवुन सदर कामांतर्गत लागणाऱ्या साहित्याकरिता दर मागविण्यात येतात त्यामुळे सन .२०२६-२७ करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागा अंतर्गत होणाया विविध कार्यक्रमा करीता तसेच विविध सभेकरीता संपुर्ण - बिछायत व्यवस्था, साऊंडसिस्टीम, मडंप डेकोरेशन व्यवस्था करण्याकरीता वर्षभर लागणाया संबधीत - .साहित्याचे भाडे तत्वावर दर मागविणे आवश्यक आहे/वस्तु

करीता सन २०२६-२७ या आर्थीक वर्षात नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागा अंतर्गत होणाया - विविध कार्यक्रमा करीता तसेच विविध सभेकरीता संपुर्ण बिछायत व्यवस्था, साऊंडसिस्टीम, मडंप डेकोरेशन व्यवस्था करणे या कामाची ई निविदा प्रक्रिया -तसेच होणाया वार्षीक खर्चाला वित्तिय व प्रशासकिय म-ान्यता देणे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील प्रमाणे कामे पूर्ण करण्यासाठी विषयानुसार संबंधित विभागाने मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच सभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचनेच्या अनुषंगाने काम करण्यास व सदर कामासाठी येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करण्याबाबत सर्वानुमते वित्तीय व प्रशाकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ ची स्थगित सभा दिनांक १२/०२/२०२६**

**ठरावाची प्रत – विषय क्रमांक २८**

विषय :- २८ सन 2026-27 करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागाकरीता कार्यालयीन कामाकरीता स्टेशनरी खरेदी करण्याकरीता प्रत्येक नगाप्रमाणे दर मागविण्याकरीता ई या-निविदा राबविणे तसेच होणा -वार्षिक खर्चास वित्तिय व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.

सूचक – सौ. किरण राकेश प्रजापती

अनुमोदक - श्री. अनुप हरिदास नैताम

ठराव :-२८

सादर करण्यात येते कि, यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ कार्यालयातील सर्व विभागांना वर्षभरात विविधा स्टेशनरीची आवश्यकता असते. मागील 2025-26 ची निविदांची कालावधी संपणार आहे. त्याकरिता वर्षभर लागणा त्यामुळे सन .या संबधीत वस्तुचे दर मागविणे आवश्यक आहे-2026-27 करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागाकरीता कार्यालयीन कामाकरीता स्टेशनरी खरेदी करण्याकरीता प्रत्येक नगाप्रमाणे दर मागवून खरेदी करणे' या कामाची ई.निविदा मागविणे आवश्यक आहे-

सन 2026-27 करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागाकरीता कार्यालयीन कामाकरीता स्टेशनरी खरेदी करण्याकरीता प्रत्येक नगाप्रमाणे दर मागवुन स्टेशनरी खरेदी करणे या कामाची ईनिविदा राबविणे तसेच सदर - या-कामावर वर्षभरात होणावार्षिक खर्चाला वित्तिय व प्रशासकिय मान्यता देणे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील प्रमाणे कामे पूर्ण करण्यासाठी विषयानुसार संबंधित विभागाने मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच सभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचनेच्या अनुषंगाने काम करण्यास व सदर कामासाठी येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करण्याबाबत सर्वानुमते वित्तीय व प्रशाकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

''करीता ठराव सर्वानुमते मंजुर''

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ ची स्थगित सभा दिनांक १२/०२/२०२६**

**ठरावाची प्रत – विषय क्रमांक २९**

विषय :- २९ यवतमाळ नगर परिषद यवतमाळ अंतर्गत येणा-या प्रत्येक विभागा करीता लेखासंहितानुसार सर्व फॅार्मस, रजिस्टर, पावती पुस्तक, बायडींग इत्यादी छपाई चे सन 2026-27 करिता कामाबाबतची ई- निविदा राबविणे तसेच होणा-या वार्षीक खर्चास वित्तिय व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.

सूचक – श्री. मनीष गणेशप्रसाद दुबे
अनुमोदक - सौ. माया मोतीलाल शेरे

ठराव :-

सादर करण्यात येते. कि, यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ कार्यालयातील सर्व विभागांना वर्षभरात लेखासंहितानुसार विविध फॉर्म्स, रजिस्टर, पावती पुस्तक, बायडींग व छपाई करणे आवश्यक असते. मागील 2025-26 च्या निविदांचा कालावधी संपणार आहे. त्याकरीताचे वर्षभर लागणा-या सदरील विविध नमुन्यांची छपाई करून साहित्य पुरवठा करण्याचे कामाचे दर मागविणे आवश्यक आहे. त्यामुळे सन 2026-27 करीता यवतमाळ नगर परिषद यवतमाळ अंतर्गत येणा-या प्रत्येक विभागा करीता लेखासंहितानुसार सर्व फॉर्म्स, रजिस्टर, पावती पुस्तक, बायडींग इत्यादी छपाई करून नगा प्रमाणे साहित्य पुरवठा करणे या कामाची ई-निविदा मागविणे आवश्यक आहे.

सन 2026-27 करीता यवतमाळ नगर परिषद यवतमाळ अंतर्गत येणा-या प्रत्येक विभागा करीता लेखासंहितानुसार सर्व फॉर्म्स, रजिस्टर, पावती पुस्तक, बायडींग इत्यादी छपाई करून नगा प्रमाणे साहित्य पुरवठा करणे या कामाची ई - निविदा राबविणे तसेच सदर कामावर वर्षभरात होणा-या वार्षीक खर्चाला वित्तिय व प्रशासकिय मान्यता देणे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील प्रमाणे कामे पूर्ण करण्यासाठी विषयानुसार संबंधित विभागाने मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच सभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचनेच्या अनुषंगाने काम करण्यास व सदर कामासाठी येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करण्याबाबत सर्वानुमते वित्तीय व प्रशाकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ ची स्थगित सभा दिनांक १२/०२/२०२६**

**ठरावाची प्रत – विषय क्रमांक ३०**

विषय :- 30 सन 2026-27 करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागाकरीता लागणारे फर्निचर व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता प्रत्येक नगाप्रमाणे दर मागविण्याकरीता ई -निविदा राबविणे तसेच होणा -वार्षिक खर्चास वित्तिय व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.

सूचक – श्री. अमोल ओमकारराव देशमुख
अनुमोदक - सौ. वैशाली प्रवीण सवाई

ठराव :- 30

सादर करण्यात येते कि, यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ कार्यालयातील सर्व विभागांना वर्षभरात विविध फर्निचर व इतर साहित्याची आवश्यकता असते. मागील 2025-26 ची निविदांची कालावधी संपणार आहे. त्याकरिता वर्षभर लागणा त्यामुळे सन .या संबधीत वस्तुचे दर मागविणे आवश्यक आहे-2026-27 करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागाकरीता विविध फर्निचर व इतर साहित्याची खरेदी करण्याकरीता प्रत्येक नगाप्रमाणे दर मागवून खरेदी करणे' या कामाची ई.निविदा मागविणे आवश्यक आहे-

सन 2026-27 करीता नगर परिषद मध्ये प्रत्येक विभागाकरीता विविध फर्निचर व इतर साहित्याची खरेदी करण्याकरीता प्रत्येक नगाप्रमाणे दर मागवुन विविध फर्निचर व इतर साहित्याची खरेदी करणे या कामाची ई - या-निविदा राबविणे तसेच सदर कामावर वर्षभरात होणावार्षिक खर्चाला वित्तिय व प्रशासकिय मान्यता देणे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील प्रमाणे कामे पूर्ण करण्यासाठी विषयानुसार संबंधित विभागाने मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच सभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचनेच्या अनुषंगाने काम करण्यास व सदर कामासाठी येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करण्याबाबत सर्वानुमते वित्तीय व प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

## यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दि.०९/०२/२०२६

**विषय क्र. ३१:-** प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ घटक क्र. ४ अंतर्गत स्वमालकीच्या जागेवरील घरे Beneficiary Led Construction (BLC) या घटकाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नगर परिषद, यवतमाळ हद्दीतील मंजूर झालेल्या घरकुलापैकी शासन निर्णयातील निकष पूर्ण करीत नसलेली तसेच बांधकाम सुरु करीत नसलेली घरे (लाभार्थी) मंजूर यादीमधून वगळण्याबाबत.

**सूचक :- श्री. देविदास नामदेवराव अराठे**

**अनुमोदक :- श्री. भारत दिगांबर ब्राम्हणकर**

**ठराव क्र. ३१:-** सदर विषय कार्यालयीन टिपणीनुसार सभेमध्ये वाचण्यात आले. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नगर परिषद यवतमाळ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना स्वमालकीची घरे घटक क्र.४ (BLC) घटकाअंतर्गत नगर परिषद यवतमाळ ला एकूण ६ सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झालेले आहेत. सदरहू मंजूर प्रकल्पातील लाभार्थीना लेखी व मौखिक सूचना देऊनही लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास तयार नाही. सदर लाभार्थीना मंजूर प्रकल्पातून वगळण्याबाबत मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन मुंबई यांनी आदेशित केलेले आहे. सदर लाभार्थीची संख्या खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | DPR No./मंजूर लाभार्थी संख्या | Curtailment करीत असलेल्या लाभार्थीची संख्या | उर्वरित लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | ४/१७४ | ३ | १७१ |
| २. | ५/२१८ | ४ | २१४ |
| ३. | ६/२१३ | १२ | २०१ |

वरील मंजूर प्रकल्प अहवालामधील जे लाभार्थी संदर्भिय शासन परीपत्रकानुसार निकष पूर्ण करीत नसेल अश्या लाभार्थीचे नाव मंजूर प्रकल्प अहवालमधुन वगळण्याबाबतचा प्रस्ताव नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे कार्यालयाकडे पाठविण्याबाबत मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी आदेशित केलेले आहे. सबब वरील विवरणाप्रमाणे १९ लाभार्थीची नावे मंजूर प्रकल्प अहवालमधुन वगळण्याकरिता सदर विषय सभेमध्ये चर्चेकरिता ठेवण्यात आला होता.

त्याअनुषगाने वरील विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. वरील विषयावर सभागृहामध्ये उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले.

तरी सदर विषयावर झालेल्या चर्चेअंती प्रधानमंत्री आवास योजना स्वमालकीची घरे घटक क्र.४ (BLC) या घटकाअंतर्गत मंजूर १९ लाभार्थी यांचे नावे मंजूर प्रकल्प अहवालातून वगळण्याकरिता मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडे प्रस्ताव सादर करण्याकरिता सदर सभा मान्यता प्रदान करीत आहे.

"करिता ठराव सर्वानुमते मंजूर"

(ॲड प्रियदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद यवतमाळ

**यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ**

**सर्वसाधारण सभा दि.०९/०२/२०२६**

**विषय क्र ३२ -** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत यवतमाळ शहरातील प्रभाग क्र.४ मधील कामगार नगर,प्रभाग क्र.२९ मधील रामकृष्ण नगर,मुलकी परिसर,फुकट नगर तसेच प्रभाग क्र.२ मधील आंबेडकर झोपडपट्टीतील तसेच इतर न.प हद्दीतील क्षेत्रामधील लाभार्थींना पट्टे वाटप करण्याकरिता अतिक्रमित क्षेत्राची मोजणीकरून पट्टेवाटप होण्यापर्यंत ची संपूर्ण कार्यवाही करणेकरिता बाह्य यंत्रणेची नेमणूक करणेबाबत.

**सूचक - श्री.नितीन उर्फ पिंटू काशिनाथ बांगर**

**अनुमोदक - सौ. साधना विनोद काळे**

**ठराव क्र. ३२ -** सदर विषय कार्यालयीन टिपणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नगर परिषद यवतमाळ प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत यवतमाळ शहरातील प्रभाग क्र.४ मधील कामगार नगर, प्रभाग क्र.२९ मधील रामकृष्ण नगर, मुलकी परिसर, फुकट नगर तसेच प्रभाग क्र.२ मधील आंबेडकर झोपडपट्टीतील तसेच इतर न.प हद्दीतील क्षेत्रामधील लाभार्थींना पट्टे वाटप करण्याकरिता या कार्यालयास निवेदन प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय यवतमाळ यांचा कडे सदर जागेची मोजणी करण्याकरिता प्रस्ताव सादर केला असता भूमी अभिलेख कार्यालय यवतमाळ यांनी सदर अतिक्रमित क्षेत्राची मोजणी नगर परिषद यवतमाळ या कार्यालयाने स्वता करून देण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषगाने वरील विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. वरील विषयाचा अनुषगाने होत असलेल्या चर्चेमध्ये सन्माननीय न.प सदस्य श्री.नितीन उर्फ पिंटू काशिनाथ बांगर, श्री.बिपीन अनिल चौधरी, सौ. चैताली निलेश बेलोकार, सौ. साधना विनोद काळे,श्री.श्रीकृष्ण मारोती कांबळे, श्री. नित्यानंद अशोक गिरी व ॲड आनंद बळीराम गायकवाड तसेच सौ.लता रमेश ठोंबरे, स्वच्छता व आरोग्य सभापती यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सूचना स्वरुपात मत व्यक्त केले.

तरी सदर विषयावर झालेल्या चर्चेअंती अतिक्रमित क्षेत्राची मोजणी करण्याकरिता बाह्य यंत्रणेची नेमणूक यापूर्वीच झाली असल्यामुळे सदर बाह्य यंत्रणा M/S Core project & engineers, अमरावती यांना यवतमाळ शहरातील न.प हद्दीतील सर्व शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमन नियमानुकुल करण्याकरिता सुधारित आदेश देऊन सदर काम हे नगर परिषद निधी मधून करण्याकरिता सर्वानुमते वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

"करिता ठराव सर्वानुमते मंजूर"

(ॲड प्रियदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्रमांक - ३३ :-** यवतमाळ न.प. हद्दीतील प्रभाग क्रमांक ०१ ते प्रभाग क्रमांक २९ मध्ये विविध ठिकाणी असलेल्या राष्ट्रसंत/थोर महापुरुष व इतर पुतळ्याला तसेच सभोवतालील ग्रीलला रंगकाम व दुरुस्ती करणेबाबत मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष/सभापती/सदस्य व शेहरातील नागरीकांनी सादर केलेल्या अर्जानुसार कामे करण्यासाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयार्थ सादर.

**सूचक :- सौ. कीर्ती संतोष राऊत**
**अनुमोदक :- श्री. चंद्रशेखर हरीकेशव चौधरी**

**ठराव क्रमांक - ३३ :-** सदर विषयावर कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. त्यानुसार यवतमाळ न.प. हद्दीतील प्रभाग क्रमांक ०१ ते प्रभाग क्रमांक २९ मध्ये विविध ठिकाणी असलेल्या राष्ट्रसंत/थोर महापुरुष व इतर पुतळ्याला तसेच सभोवतालील ग्रीलला रंगकाम व दुरुस्ती करणेबाबत मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष/सभापती/सदस्य व शहरातील नागरीक पत्र/अर्जाद्वारे कळवितात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महाशिवरात्री निमीत्य दरवर्षी करण्यात येत असलेल्या रंगकाम व दुरुस्ती बाबतची निविदा ह्या सदर जयंती /महाशिवरात्री पुरत्याच असतात. सबब वरीलप्रमाणे खर्चास व कामास न.प. निधी मधुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्रदान करण्याकरिता सदर विषय मा. सर्वसाधारण समिती सभेत सविनय सादर.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये श्री. चंद्रशेखर हरीकेशव चौधरी, सौ. कीर्ती संतोष राऊत यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

वरील चर्चेअंती निविदा प्रक्रीयेला वेळ लागणार असल्यामुळे दिनांक १५/०२/२०२६ रोजी "महाशिवरात्री" निमीत्य यवतमाळ नगर परिषद हद्दीतील पांढरकवडा रोड, लोहारा, वडगांव, वाघापुर व भोसा येथील हिंदु स्मशानभुमी, मधील श्री. शंकराच्या मूर्तीस रंगकाम करणे. व (छत्रपती महोत्सव २०२६) दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्य यवतमाळ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याला रंगकाम व दुरुस्ती करणेबाबत. तसेच रमजान ईद निमीत्य मुस्लीम कब्रस्थान येथे रंगकाम व दुरुस्ती करणेबाबतचे कामे वेळेच्या आधी करणे गरजेचे असल्यामुळे सदरचे कामे तात्काळ करणे करीता आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच समाजमंदीराचे/समाजभवनाचे सुद्धा रंगकाम करण्यात यावे असे चर्चेअंती ठरले.

त्याअनुषंगाने विविध ठिकाणी रंगरंगोटी करण्याचे  कामाकरीता संपुर्ण कामाचे १ वर्षाकरीता निविदा प्रक्रीया करावी जेणे करुन वेळेवर काम पुर्ण करता येईल.

सबब उक्त नमुद प्रमाणे व चर्चेनुसार रंगरंगोटी करणेबाबतचे कामास, निविदा प्रक्रियेस, व येणा-या खर्चास नगर परिषद निधी मधुन अदा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. संबंधीत विभागाने मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर"

PAuike

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा

**दिनांक 09/02/2026**

**तहकुब सभा दिनांक- 12/02/2026 रोजी पारित झालेला ठराव क्र- 34 ची प्रत**

**विषय क्र:** - नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील जागतिक बँक अर्थसहाय्य अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या भूमिगत गटार योजनेचा तिसरा टप्प्यामध्ये योजनेच्या विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये नमूद केलेल्या भागांमध्ये चार 4 सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (Sewage Treatment Plants – STP) उभारणे करिता भूसंपादन करणेसाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर..

सुचक – सौ. वैशाली प्रवीण व्यवहारे

अनुमोदक -श्री. शिवानंद अशोक गिरी

**ठराव क्र** – उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर की, नगरपरिषद यवतमाळ हद्दीतील नागरिकांना सुदृढ, सुरक्षित व शाश्वत स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने भूमिगत गटार योजना टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. भूमिगत गटार योजना – टप्पा एक हा अमृत 1.0 (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation – AMRUT) अंतर्गत यशस्वीरीत्या राबविण्यात आला आहे. भूमिगत गटार योजना –टप्पा दोन हा नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील उर्वरित भागात भूमिगत गटार योजनेचा तिसरा टप्पा राबविण्याचा मानस असून, सदर टप्पा जागतिक बँक अर्थसहाय्य अंतर्गत राबविण्याचा प्रस्ताव आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या, नागरीकरण, सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न तसेच पर्यावरणीय स्वच्छतेच्या दृष्टीने भूमिगत गटार योजनेचा तिसरा टप्पा राबविणे अत्यावश्यक आहे. सदर प्रकल्पामुळे सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम होऊन शहराची स्वच्छता, नागरिकांचे आरोग्य व जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. भूमिगत गटार योजनेच्या तिसऱ्या टप्प्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भूमिगत गटार योजनेच्या विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये नमूद असेलेल्या भागांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (Sewage Treatment Plants – STP) उभारणे आवश्यक आहे. सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या उभारणीसाठी आवश्यक त्या ठिकाणी भूसंपादन करणे अनिवार्य आहे. वरीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या ठिकाणी भूसंपादन करण्याचा प्रस्ताव सभेत ठेवण्यात आला. कार्यालयीन टिपणीचे सभेत वाचन करण्यात आले. त्यावर सर्वसाधारण सभेत विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

त्यानंतर नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील जागतिक बँक अर्थसहाय्य अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या भूमिगत गटार योजनेचा तिसरा टप्प्याध्ये योजनेच्या विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये नमूद केलेल्या भागांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (Sewage Treatment Plants – STP) उभारणे करिता भूसंपादन करणेसाठी मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (Sewage Treatment Plants – STP) उभारणे करिता खालील ठिकाणी भूसंपादन करण्यासाठी मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

1. मौजा उमरसरा सर्व्हे नंबर- 08
2. मौजा भोसा गट नंबर 31,31 व 07
3. मौजा डोळंबा सर्व्हे नंबर- 02
4. मौजा लोहारा गट क्रमांक – 59/1
5. मौजा भोसा सर्व्हे नं-33, गट नंबर 97
6. मौजा उमरसरा शीट नंबर- 41

पुढील कार्यवाहीचे आधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यात येत आहेत.

**"करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

(ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

सुचक :- श्री. नित्यानंद गिरी
अनुमोदक :- श्री. संतोष बोरले

विषय क्रमांक - ३५ :- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र. ०१ ते ०४ अंतर्गत येणारे प्रभाग क्र. ०१ ते २९ मध्ये आवशक्यते नुसार रस्त्याचे पॅचेस दुरुस्ती व खडीकरणाचे कामे करणे या कामाला नगर परिषद निधी अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेसाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर ...

ठराव क्रमांक – ३५ :- सदर विषय कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. यामध्ये यवतमाळ नगर परिषद हद्दीतील शहरातील मुख्य रस्ते व प्रभागातील अंतर्गत मुख्य रस्त्यांचे पॅचेस / खड्डे बुजविण्याबाबत सर्व साधारण नागरिकांचे अर्ज या कार्यालयास प्राप्त होत आहेत. तसेच नागरिकांना शाळा, रुग्णालय, बस स्थानक, ईत्यादी ठिकाणी ये-जा करता वाहतुकीस येणारी अडचणीचा विचार करता पॅचेस खड्डे बुजविण्याचे कामे करणे आवश्यक आहे. तरी नागरिकांची सुरक्षितता व सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्याच्या दृष्ट्रीने सदर रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविणे आवश्यक आहे. करिता नगर परिषद निधी अंतर्गत यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र. ०१ ते ०४ अंतर्गत येणारे प्रभाग क्र. ०१ ते २९ मध्ये आवशक्यते नुसार रस्त्याचे पॅचेस दुरुस्ती व खडीकरणाचे कामे करणे, करिता प्रस्तावित कामे नगर परिषद निधी अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव मा. सर्वसाधारण समिती सभेच्या निर्णयास सादर करण्यात येत आहे. प्रस्तावित कामास मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रिक मंजूरी घ्यावी लागेल, सदर बाब मा. सभेच्या निर्देशनास आणुन दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेअंती सन्मानिय सदस्य श्री. नित्यानंद गिरी, गटनेता, श्री. संतोष बोरले, सौ. वैशाली सवाई, विरोधी पक्षनेता, गटनेता, श्री. लोकेश इंगोले यांनी सदर विषयास सहमती दर्शविली परंतु शहरातील प्रभाग क्र. ०१ ते २९ प्रभागातील खड्डे बुजविण्याकरीता प्राथमीक स्थळ पाहणी करुन झोननुसार अंदाजपत्रक तयार करण्यात यावे तसेच प्रभागातील खड्डे बुजवावे अशी सुचना दिली तसेच श्री. संतोष बोरले यांनी डांबरी Patches कामाचे शासन निर्णयानुसार दोष दायीत्व कालावधी चा विचार करुन पुढील कार्यवाही करावी असे निर्देशीत केले.

उक्त नमुद विषयास नियमानुसार कार्यालयाने कार्यवाही करावी. असे ही सभा ठरवित आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर"

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

यवतमाळ नगर परिषद,यवतमाळ

सर्वसाधारण सभा दि.९/२/२०२६ ची स्थगीत सभा दि.१२/२/२०२६

विषय क्र.३६-२०२६-२७ करीता सुरक्षा रक्षक पुरवठा कंत्राट पध्दतीने राबविण्याचे कामाकरीता निविदा प्रक्रीयेसह येणा-या वार्षीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यताबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.किर्ती संतोष राऊत

अनुमोदक – श्री.पंकज वसंतराव देशमुख

ठराव क्र.३६- नगर परिषद कार्यालयीन पुरक टिप्पणी नुसार,नगर परिषदेची मालकीच्या प्रशासकीय मालमत्ता सुरक्षेतेच्या दृष्टीने सन २०२६-२७ या कालावधीकरीता निविदा प्रक्रीया करावी लागेल.यामध्ये सद्यस्थीतीमध्ये सुरु असलेल्या कंत्राटदार युनिटी पॉवर फॅसिलीटीज प्रा.लि. यांचे कार्यालयीन सुरक्षा रक्षक पुरवठा आदेश क्र.२१२ दि.२८/२/२०२५ नुसार व करारनामा नुसार ११ महीण्याचे कालावधी जानेवारी २०२६ मध्ये पुर्ण होत आहे . निविदा प्रक्रीया होईस्तर सद्यस्थीतीमध्ये सुरु असलेल्या कंत्राटदार युनिटी पॉवर फॅसिलीटीज प्रा.लि.यांचेकडुन मंजुर असलेल्या दरानुसार काम करुन घ्यावे लागेल. सभेमध्ये वाचण्यात आले.यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेमध्ये सौ.वैशाली प्रविण सवाई गटनेता भारतीय राष्ट्रीय क्रांगेस तथा नगरसेविका,नामनिर्देशित सदस्य श्री.संतोष बोरले,नामनिर्देशीत सदस्य श्री.अमोल देशमुख यांनी सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चेअंती वरील प्रमाणे विषयानुसार नगर परिषदेची मालकीच्या प्रशासकीय मालमत्ता सुरक्षेतेच्या दृष्टीने सन २०२६-२७ या कालावधीकरीता सन्मानिय सभेमध्ये सन्मानीय सदस्य यांनी केलेल्या सुचना विचारात घेवून निविदा प्रक्रीया करावी. निविदा प्रक्रीया होईस्तर सद्यस्थीतीमध्ये सुरु असलेल्या कंत्राटदार युनिटी पॉवर फॅसिलीटीज प्रा.लि.यांचेकडुन मंजुर असलेल्या दरानुसार काम करुन घ्यावे .यावर सामान्य प्रशासन(सभा)विभागाने नियमानुसार मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार कार्यवाही करावी. सदर कामासाठी येणारा निविदा प्रक्रीयेसह खर्च नगर परिषद निधीमधून करण्याबाबत सर्वानुमते वित्तीय व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद,यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा

## दिनांक 09/02/2026

## तहकुब सभा दिनांक- 12/02/2026 रोजी पारित झालेला ठराव क्र- 37 ची प्रत

**विषय क्र: ३७** - मा. सर्वोच्च न्यायालयाने SUO MOTO WRIT PETITION (Civil) No(s).5 of 2025 या प्रकरणामध्ये नमूद केल्यानुसार तसेच प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील तरतुदीनुसार भटक्या श्वानाना ठेवण्यासाठी निवारा केंद्र तयार करण्यासाठी जागा निश्चित करून निवारा केंद्र बांधणे बाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णय सादर.

**सुचक – श्री विलास उर्फ दत्ता कुलकर्णी**
**अनुमोदक - श्री नित्यानंद अशोक गिरी**

**ठराव क्र ३७** – मा. सर्वोच्च न्यायालयाने SUO MOTO WRIT PETITION (Civil) No(s).5 of 2025 या प्रकरणामध्ये भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुलांवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर निर्देश जारी केले असून प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, 2023 मधील अनुषंगिक बार्बीचे तातडीने अनुपालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना भटके श्वान यांना पकडणे, निर्बिजीकरण आणि लसीकरण करण्याचे काम सातत्याने करणे अनिवार्य आहे. याच बरोबर शहरातील विविध संस्थाच्या परिसरातील आढळलेले तसेच रेबीजग्रस्त व आक्रमक भटके श्वान यांना स्थायी निवारा यामध्ये स्थलांतरित करणेसुद्धा अनिर्वाय आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार आवश्यक क्षमतेने ABC केंद्र व स्थायी निवारा निर्मिती व क्षमता वाढ, सदर सुविधांचा पूर्ण क्षमतेने वापर, हेल्पलाइन सुविधा प्रभावी उपलब्धता, विशिष्ट फीडिंग झोन निर्मिती तसेच शहरातील विविध संस्थाची किमान दर 3 महिन्यांनी तपासणी व आवश्यक सुरक्षा उपाय अंमलबजावणी, अँटी रेबीज लस आणि इम्युनोग्लोब्युलिनचा पुरेसा साठा याबाबत प्रभावी कार्यवाही करण्याचे नियोजन करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याच्या सूचना यापूर्वी वारंवार देण्यात आल्या आहेत. करिता नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रात भटक्या श्वाना ना ठेवण्यासाठी निवारा केंद्र बांधणे आवश्यक आहे. सबब सदरचा विषय सभेसमोर ठेवण्यात आला होता.

वरीलप्रमाणे विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीचे सभेत वाचन करण्यात आले. त्यावर सर्वसाधारण सभेत विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर मा. सर्वोच्च नायायलयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नगर परिषद यवतमाळ मार्फत कार्यवाही करण्यासाठी मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच नगर परिषद यवतमाळ क्षेत्रातील 1000 भटक्या श्वानांसाठी स्थायी निवारा निर्मिती करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच भटक्या श्वानासाठी स्थायी निवारा केंद्र उभारण्याकरिता आवश्यक असलेली जागा 361- नागपुर-तुळजापुर राष्ट्रीय महामार्गाच्या लगत सांडपाणी प्रक्रिया केंद्राजवळील मोकळया जागेत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

पुढील कार्यवाहीचे आधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यात येत आहेत.

**" करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

(अॅड. प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्रमांक - ३८ :-** न.प. प्रभाग क्र. ०६ मधील गजानन वाटीका ते बायपास रोड वरील मणीराम सोसायटी जवळीलचौकास अधिकृतपणे "राजे चौक" नावाने संबोधित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी तसेच बागडी टाईल्स तेमणीराम सोसायटी कडे जाणा-या रस्त्यांला राजे छत्रपती शिवाजी मार्ग असे नामकरण करण्यातबाबत..

**सूचक :- विशाल सुधाकर पावडे**
**अनुमोदक :- सौ. वैशाली प्रवीण सवाई**

**ठराव क्रमांक - ३८ :-** सदर विषयावर कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. अहवाल सादर की, श्री. विशाल सुधाकर पावडे, न.प. सदस्य, प्रभाग क्र. ६ (ब) न.प. यवतमाळ यांचे अर्जानुसार,

१) न.प. प्रभाग क्र. ०६ मधील गजानन वाटीका ते बायपास रोड वरील मणीराम सोसायटी जवळील चौकास अधिकृतपणे "राजे चौक" नावाने संबोधित करण्याचाबत कार्यवाही करण्यात यावी,
२) बागडी टाईल्स ते मणीराम सोसायटी कडे जाणा-या रस्त्याला राजे छत्रपती शिवाजी मार्ग असे नामकरण करण्यात यावे.

सदर विषय विषय पत्रिकेवर घेण्यात यावे असे नमुद आहे.

सबब रस्त्यांचे व चौकांचे नामकरण - मार्गदर्शक सूचना (कलम १८५) नुसार खालील प्रमाणे मार्गदर्शन दिलेले आहे.

१) अधिकार क्षेत्रः नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांचे नाव देणे, बदलणे किंवा क्रमांक निश्चित करणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम आहे.
२) ठराव प्रक्रियाः नामकरणाचा प्रस्ताव नगरपरिषदेच्या साधारण सभेत (General Body Meeting) विशेष बहुमताने किंवा नियमानुसार ठराव मंजूर करावा लागतो.
३) नामकरणाचे निकषः - नाव हे राष्ट्रीय नेते, थोर समाजसुधारक, स्थानिक ऐतिहासिक व्यक्ती किंवा सार्वजनिक भावनांगी निगडीत असावे, विवादास्पद नावे टाळावीत.
४) **सार्वजनिक हित व हरकतः नवीन नाव देण्यापूर्वी सामान्य जनतेकडून हरकती/सूचना मागवणे योग्य ठरते, जेणेकरून भविष्यातील वाद टळतील.**
५) अंमलबजावणीः ठराव मंजूर झाल्यानंतर फलक लावणे आणि शासकीय दप्तरी नोंद करणे आवश्यक आहे.

करीता सदर विषयावर चर्चा करुन योग्य निर्णय घेणे उचित राहील.

याबाबतची कार्यालयीन टिप्पणीनुसार सभागृहांत वाचन करण्यात आले. त्यानंतर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती पुढील कार्यवाही कार्यालयाने नियमानुसार करावी व फलक लावने करिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंज

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

**सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६**

**विषय क्रमांक - ३९ :-** नगर परिषद यवतमाळ मार्फत देण्यात येणा-या नाहरकत प्रमाणपत्राकरीता सेवा शुल्क आकारणी बाबत धोरण निश्चित करण्यासाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयार्थ सादर.

सूचक :- **श्री. नित्यानंद अशोक गिरी**
अनुमोदक :- **सौ. रिता गजानन धावतोडे**

**ठराव क्रमांक - ३९ :-** सदर विषय कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. यामध्ये यवतमाळ नगर परिषदेकडे विविध प्रकारचे नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केल्या जातात जसे व्यवसायाकरीता नाहरकत प्रमाणपत्र, विद्युत लाईनकरीता नाहरकत प्रमाणपत्र, पिठ गिरणी इत्यादी तसेच मा. उपविभागीय अधिकारी यवतमाळ आणि तहसिल कार्यालयाकडून आझाद मैदान आणी समता मैदान भाड्याने देण्याकरीता प्राप्त झालेल्या पत्रानुसार अभिप्राय/नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे. तसेच न.प. च्या अधिनस्त असलेल्या खुल्या जागेवर, उद्यानमध्ये सार्वजनिक / राजकिय / धार्मिक व सांस्कृतिक/ योगा/ विवाह सोहळा व स्वागत समारंभ / प्रदर्शन इत्यादी साठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक : जमीन १०९४/प्र.क्र.५८/ज-१ दिनांक ३ मार्च २००७ नुसार धोरण निश्चित करणे.

सदर कार्यक्रमा मध्ये ब-याच प्रमाणात नागरीक जमा होतात सदर कार्यक्रमामध्ये त्यांचे खानपाण्यात वापरल्या जाणारे साहित्य ब-याच प्रमाणात जमा होवुन ते इतरत्र टाकले जातात या कर्यालयामार्फत साफसफाई करण्यात येते. सदरचे साफ सफाई पोटी सेवा शुल्क म्हणून शासन निर्णय न.वि.विभाग-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दि. २६/०८/२०११ नुसार महा लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत सेवा पुरविण्याबाबतचे सेवा शुल्क निश्चित करण्याचे अधिकार संबंधित प्राधिकरणाचे असल्यामुळे या कार्यालयामार्फत देण्यात येणारे विविध प्रकारचे नाहरकत प्रमाणपत्रा करीता सेवा शुल्क प्रस्तावित करण्यास धोरण निश्चित करणे उचित राहील. सदरची बाब सभेच्या निदर्शनास आणुन दिले.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये श्री. नित्यानंद अशोक गिरी, गटनेता भारतीय जनता पार्टी, सौ. रिता गजानन धावतोडे, चंद्रशेखर हरिकेशव चौधरी, श्री. भारत दिगांबर ब्राम्हणकर, श्री. पिंटू उर्फ नितीन काशिनाथ बांगर, श्री. आनंद बळीराम गायकवाड, सौ. साधना रविंद्र शंभरकर, श्री. मोहम्मद शाकिर मोहम्मद नजीब, श्री. जावेद परवेज अब्दुल समद अन्सारी, सौ. वैशाली प्रविण सवाई गटनेत्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, सौ. अमृता ओमप्रकाश तिवारी, श्री. संतोष भगवान बोरले यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चेअंती नगर परिषद यवतमाळ मार्फत देण्यात येणा-या नाहरकत प्रमाणपत्राकरीता सेवा शुल्क आकारणी बाबत धोरण निश्चित करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती स्थापण करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्रमांक - ४० :-** यवतमाळ न. प. हद्दीतील महात्मा फुले चौक येथील महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळयाजवळ आई सावित्रीबाई फुले यांचे पूर्ण पुतळा (म्युरल शिल्प) बसविण्या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**सूचक :- श्री. देविदास नामदेवराव अराठे**
**अनुमोदक :- ॲड. आनंद बळीराम गायकवाड**

**ठराव क्रमांक - ४० :-** सदर विषयावर कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकिर्ण-१००१/१६८५/प्र.क्र.१२४/२००१/२९ दिनांक ०२ ऑगष्ट २००३ तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:- स्मारक- ३१०२/८८४/प्र.क्र.१२२/२००२/२९ दिनांक ०२ फेब्रुवारी २००५ नुसार राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा उभरण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहे.

त्यामधी मुद्दा क्र. ८ नुसार स्थानिक संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

करीता यवतमाळ न. प. हद्दीतील महात्मा फुले चौक येथील महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळयाजवळ आई सावित्रीबाई फुले यांचे पूर्ण पुतळा (म्युरल शिल्प) बसविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत चर्चा करुन योग्य निर्णय घेणे उचित.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी व त्याकरिता येणाऱ्या खर्चास नगर परिषद निधी मधुन किंवा संबंधित योजनेमधून करण्यास करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर."

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**नगर परिषद यवतमाळ सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ चे सभेतील ठराव क्रं. ४१ ची प्रत.....**

विषय क्रं.४१ - मौजा पिंपळगांव यवतमाळ प्रभाग क्र.०७ मध्ये मोक्षधाम करीता मौजा टाकळी सर्वे नं.९० ई वर्ग सरकारी जमीन अधिग्रहन करणेबाबत....

सुचक - ॲड.श्रध्दा गजानन भडके

अनुमोदक - श्री.सुभाष दयाराम राय

ठराव क्रं.४१ - यवतमाळ शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना

अधिनियम १९६६ चे कलम ३१ खाली शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्रं.टिपीएस-२७९५/१६००/सीआर-२५२/युडी-१३,दि.८/७/१९९८ अन्वये मंजूर करण्यांत आली आहे. तसेच या कायर्कालयाचे पत्र क्रं. १४३६,दिनांक २८/३/२०२५ अन्वये प्रारूप विकास योजना यवतमाळ(मुळ हद्द अधिक दु.सु व वाढीव क्षेत्र) शासनाच्या मंजुरीस्तव सादर करण्यांत आली आहे. या विकास योजने मध्ये जवळपास न.प.मालकीची जागा नसल्याने मौजा टाकळी सर्वे नं.९० मध्ये ई वर्ग असलेली जागा नगर परिषदेला भुसंपादनाची कार्यवाही करावी लागेल. प्रादेशिक योजना यवतमाळ मध्ये नगर परिषद हद्दीपासून १.०० किलो मिटरचे आंत परिघस्त नियोजान क्षेत्र नकाशात मौजा टाकळी सर्वे नं.९० समाविष्ट होत आहे. उक्त स.क्र.गांव रस्ता क्रं.१३ ला सन्मुख दर्शविण्यातआला आहे. तसेच गाव नकाशाचे अवलोकन केले असता सदरचीजमीन ई-वर्गवारीची असल्याचे दिसून येते.

सदरची जमीन नगर परिषदेला हस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचकडे सादर करून त्यांचे कार्यालया मार्फत बिना मोबदला किंवा अधिमुल्य रक्कम निश्चित झाल्यानंतर उक्त रक्कम शासन खाती जमा करून हस्तांतरण करता येईल.

त्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे सादर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे व पुढील कार्यवाहीचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यांत येत आहे.

"ठराव सर्वानुमते मंजुर"

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोकराव उईके)
नगराध्यक्षा,
नगर परिषद,यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**विषय क्रमांक - ४२ :-** नगर परिषद यवतमाळ हद्दीतील व्हेनिशियन हॉटेल ते जांब रोड या मार्गास प.दिनदयाल उपाध्याय यांचे नाव देणेबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

**सूचक :- श्री. बिपीन अनिल चौधरी**
**अनुमोदक :- सौ. सोनाली पंकज मडावी**

**ठराव क्रमांक - ४२ :-** सदर विषयावर कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. अहवाल सादर की, यवतमाळ नगर परिषद हद्दीतील व्हेनिशीयन हॉटेल ते जांब रोड या मार्गास मा. पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचे नाव देणेबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी निर्देशीत केले आहे.

सबब रस्त्यांचे व चौकांचे नामकरण - मार्गदर्शक सूचना (कलम १८५) नुसार खालील प्रमाणे मार्गदर्शन दिलेले आहे.

१) अधिकार क्षेत्रः नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांचे नाव देणे, बदलणे किंवा क्रमांक निश्चित करणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम आहे.

२) ठराव प्रक्रियाः नामकरणाचा प्रस्ताव नगरपरिषदेच्या साधारण सभेत (General Body Meeting) विशेष बहुमताने किंवा नियमानुसार ठराव मंजूर करावा लागतो.

३) नामकरणाचे निकषः - नाव हे राष्ट्रीय नेते, थोर समाजसुधारक, स्थानिक ऐतिहासिक व्यक्ती किंवा सार्वजनिक भावनांशी निगडीत असावे. विवादास्पद नावे टाळावीत.

४) सार्वजनिक हित व हरकतः नवीन नाव देण्यापूर्वी सामान्य जनतेकडून हरकती/सूचना मागवणे योग्य ठरते, जेणेकरून भविष्यातील वाद टळतील.

५) अंमलबजावणीः ठराव मंजूर झाल्यानंतर फलक लावणे आणि शासकीय दप्तरी नोंद करणे आवश्यक आहे.

करीता सदर विषयावर चर्चा करुन योग्य निर्णय घेणे उचित.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये श्री. नित्यानंद अशोक गिरी, सौ. वैशाली प्रवीण सवाई गटनेत्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, यांनी चर्चेमध्ये सदर विषयावर सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

चर्चेअंती पुढील कार्यवाही कार्यालयाने नियमानुसार करावी व फलक लावने करिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. असेही सभा ठरवीत आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर."

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**दिनांक ०९/०२/२०२६ रोजीच्या स्थगीत सभेनंतर दिनांक १२/०२/२०२६ रोजी नगर परिषद सर्वसाधारण सभेत पारीत झालेला ठराव क्र. ४३ ची प्रत**

विषय क्र. ४३ :— नगर परिषद अधिनस्त असलेल्या व सदयस्थितीत बंद झालेल्या नगर परिषद शाळा चालविण्यासाठी खाजगी शैक्षणिक संस्थाना बिओटी तत्वावर देण्यासाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

सुचक :— श्री.नित्यानंद अशोक गिरी

अनुमोदक :— सौ.प्रियंका चेतन भवरे

देशमुख

**ठराव क्र. ४३ :—** विषयांकित बाबतचा अहवाल नगर परिषद सर्वसाधारण सभेत ठेवला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. यवतमाळ नगर परिषद दवारा संचालित नगर परिषदेच्या एकूण १५ उच्च प्राथमिक शाळा सुरू आहेत. यामध्ये मराठी माध्यमाच्या ११ , हिंदी माध्यमाची ०१ आणि उर्दू माध्यमाच्या ०३ असे एकंदरीत १५ शाळा आहेत. मराठी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या खालील शाळांची पटसंख्या कमी झाल्यामूळे उपरोक्त शाळा बंद पडलेल्या आहेत.

| अ.क्र | बंद असलेल्या शाळेचे नाव/ इमारत |
|---|---|
| १ | नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. १५ तलावफैल,यवतमाळ |
| २ | नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. ०३ हिदी सेवानगर ,यवतमाळ |
| ३ | नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. १६ सिंघानीया नगर ,यवतमाळ |
| ४ | नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. १७ बाजोरीया नगर,यवतमाळ |
| ५ | नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. ०८ पिंपळगाव ,यवतमाळ |

उपरोक्त बंद असलेल्या शाळांबाबत विषयाचे अनुषंगाने सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा करून सदर शाळा खाजगी शैक्षणिक संस्थाना बिओटी तत्वावर देण्यासाठी उपस्थित सदस्यांनी विरोध दर्शविला आणि यासंबंधाने ठराव बहुमताने नामंजूर करण्यात आला.

करीता ठराव बहुमताने नामंजूर.

PAuike

(ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद,यवतमाळ

# कार्यालय नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०२/२०२६ रोजीची स्थगीत सभा दिनांक १२/०२/२०२६

**सुचक :- श्री. बिपीन चौधरी**

**अनुमोदक :- श्री. विशाल पावडे**

विषय क्रमांक - ४४ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरन मार्फत अमृत योजने अंतर्गत यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग २९ मौजा वडगांव येथील मंजुर रस्त्याच्या कामात बदल करणेबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

ठराव क्रमांक – ४४ :- सदर विषय कार्यालयीन टिप्पणी नुसार सभेमध्ये वाचण्यात आले. यामध्ये मा. नगरसेवक श्री. बिपीन अनिल चौधरी व सौ. सोनाली पंकज मडावी प्रभाग क्र.२९ यांनी या कार्यालयास महाराष्ट्र जिवन प्राधीकरण मार्फत अमृत योजने अंतर्गत यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. २९ (जुना प्रभाग क्र. २८) मधील मंजुर खालील प्रमाणे रस्त्याचे कामाबाबत बदल करुन देणेबाबत अर्ज सादर केला आहे.

| अ. क्र. | मंजूर कामाचे नांव | बदल करण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | गजानन महाराज मंदिर ते श्री कदम ते श्री घोरदडे ते श्री भगत ते श्री बंडेवार यांच्या परापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | त्रिमूर्ती नगर जयसिंगपुरे लेआउट, सह्याद्री सोसायटी (वडगाव परिसर) मधील TVS शोरूम समोरील रुद्र डेअरी ते गजानन महाराज मंदिर, हुरेराव यांचे घर ते श्री जी वाईन बार रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| २ | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील जुना प्रभाग क्र २८ येथील माचीमार सोसायटी येथील माचीमार मंदिर ते श्री प्रल्हाद राऊत यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील नवीन प्रभाग क्र २९ मधील शर्मा यांच्या घराजवळून रजनी गॅस गोडावून समोरून ते श्री अतुल गुघाने यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. |
| ३ | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील जुना प्रभाग क्र २८ जिजाऊ नगर मध्ये वसंत राठोड ते श्री रामटेके यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील नवीन प्रभाग क्र २९ गजानन महाराज मंदिर मागून श्री खोडकुंभे, श्री नखाते यांच्या घरासमोरून ते श्री अर्मळ ते साई मंदिर रस्त्याचे डांबरीकरण करणे. |

उक्त नमुद प्रमाणे रस्त्याचे कामाबाबत बदल करुन देणेबाबत अर्ज सादर केला आहे. मंजूर कामे महाराष्ट्र जिवन प्राधीकरण मार्फत अमृत योजने अंतर्गत असुन सदर कामे मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्थापन केलेल्या समीती मार्फत सुचविलेली आहेत. तरी सदर कामाच्या मुळे ठीकाणामध्ये बदल करावयाच्या असल्यास सदरच्या प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांना पाठवावा लागेल. सदर बाब मा. सभेच्या निर्देशनास आणुन दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेअंती सन्मानिय सदस्य श्री. नित्यानंद गिरी श्री. बिपीन अनिल चौधरी, यांनी सदच्या विषयास सहमती दर्शविली. श्री. विशाल पावडे यांनी सदर विषय हा न्यायालयीन प्रक्रियेत असल्यामुळे ह्या बाबींचा विचार करण्यात यावी असे मत व्यक्त केले. मा. मुख्याधिकारी यांनी बदल प्रस्ताव हा मंजुरीकरीता मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करण्यात येईल. असे सुचविले

उक्त नमुद विषयास नियमानुसार कार्यालयाने कार्यवाही करावी. असे ही सभा ठरवित आहे.

"करीता ठराव सर्वानुमते मंजूर"

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

यवतमाळ नगर परिषद,यवतमाळ

सर्वसाधारण सभा दि.९/२/२०२६ ची स्थगीत सभा दि.१२/२/२०२६

वि.अध्यक्षा महोदय यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

विषय क्र.४५-बालाजी सोसायटी येथील विर सावरकर मैदान नियमीत येथे योगाभ्यास घेणे करीता परवानगी देणे बाबत.

सुचक – श्री.नित्यानंद अशोक गिरी

अनुमोदक – श्री.सुभाष दयाराम राय

ठराव क्र.४५- योगा परिवार यवतमाळ यांचे अर्जामध्ये नमुद प्रमाणे सदर योगाभ्यास निशुल्क व नागरीकांचे आरोग्य सदृट व निरोगी राहावे या दृष्ट्रीने घेण्यात येतात यामध्ये कोणालाही त्रास होत नाही.त्यामुळे या मैदानावर नियमीत सकाळी ६.१५ ते ७.१५ (१ तास) परवानगी मागीतली आहे.

सदर विषय सभेमध्ये वाचण्यात आले. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये श्री.नित्यानंद अशोक गिरी यांनी आपले सुचना स्वरुपात मत व्यक्त केले.

सरतेशेवटी योगा परिवार यांचे अर्जानुसार सामाजीक दृष्ट्रीकोण लक्षात घेता नगर परिषद हद्दीतील उमरसरा परिसरातील विर सावरकर मैदान(रंगोली)मैदान देण्यासंदर्भात नगर परिषदेच्या अटी व शर्ती ला अधीन राहुन निशुल्क नियमीत सकाळी ६.१५ ते ७.१५ (१ तास) या वेळेकरीता परवानगी देण्यात येत आहे .यापुढील नियमानुसार कार्यवाही नियोजन विभाग प्रमुख यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करीता ठराव मंजुर"

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद यवतमाळ

यवतमाळ नगर परिषद,यवतमाळ

सर्वसाधारण सभा दि.९/२/२०२५ ची स्थगीत सभा दि.१२/२/२०२५

वि.अध्यक्षा महोदय यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

विषय क्र.४६- सौ.वैशाली प्रविण सवाई गटनेता भारतीय राष्ट्रीय क्राग्रेंस तथा नगर सेवक नगर परिषद यवतमाळ यांना विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देणे बाबत.

सुचक – श्री.अंसारी जावेद परवेज अब्दुल समद

अनुमोदक – श्री.प्रमोद भास्कर बगाडे

ठराव क्र.४६- सौ.वैशाली प्रविण सवाई गटनेता भारतीय राष्ट्रीय क्राग्रेंस तथा नगर सेवक नगर परिषद यवतमाळ यांना विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देणे बाबत प्रस्ताव सभेत वेळेवर येणा-या विषयामध्ये मांडण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सौ.वैशाली प्रविण सवाई गटनेता भारतीय राष्ट्रीय क्राग्रेंस तथा नगर सेवक नगर परिषद यवतमाळ यांना विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देण्यात आली.

" करीता ठराव मंजुर"

(अ‍ॅड.प्रिदर्शनी बिना अशोक उईके)

अध्यक्ष

नगर परिषद यवतमाळ